


पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक २९६ ■ बुधवार, दि. ६ मे २०२६ ■ मुल्य ५ रुपये ■ पृष्ठे ८

RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN /283 / 2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com



# डंपिंग ग्राऊंडवर मृत्यूचा सापळा...!


## ▶▶ प्रशासन सुस्त, प्रदूषण नियंत्रण मंडळ नक्की आहे कुठे ? ▶▶ जिल्हाधिकाऱ्यांनी गुन्हे दाखल करावे अशी परिस्थिती






प्रतिनिधी ६ मे

**अकोला:** स्वच्छतेच्या नावाखाली अकोला शहरात सध्या कचरा घंटागाडीचा मोठा 'खेळ' सुरू असून, या माध्यमातून व्यावसायिक आणि घरगुती ग्राहकांची उघडपणे लूट केली जात असल्याचा खळबळजनक प्रकार समोर आला आहे. विशेष म्हणजे, या सर्व गैरप्रकारावर महापालिका प्रशासनाने मौन धारण केल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. व्यावसायिकांकडून मनमानी वसुली सुरु आहे. तर दूसरीकडे बायोमेडिकल वेस्ट घंटागाडी आणले जात असून जे नियमबाह्य आहे. मेडिकल वेस्ट देखील कचरा घंटागाडीत आणले जात असून प्रदूषण नियंत्रण मंडळ झोपल्याचे चित्र असून हा विभाग अकोल्यात बंद झाल्याची ओरड नागरिकांची आहे. शहरात पसरणारी ही दुर्गंधी आणि मेडिकल वेस्टमुळे ओढवणारे संकट रोखण्यासाठी आता प्रशासनाने तातडीने पावले उचलणे गरजेचे आहे, अन्यथा अकोल्यात आरोग्याचा मोठा स्फोट होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तर अनेक प्रभागात घंटागाडी नियमित




### महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ 'अदृश्य'?

या संपूर्ण प्रकरणात सर्वात मोठा प्रश्न महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या भूमिकेवर उपस्थित होत आहे. मेडिकल वेस्टची उघड्यावर विल्हेवाट लावली जात असताना आणि डंपिंग ग्राऊंड असुरक्षित असतानाही प्रदूषण नियंत्रण मंडळ गप्प का आहे ? हे मंडळ नेमके अस्तित्वात आहे की बंद झाले आहे, असा उपरोधिक सवाल आता अकोलेकर विचारत आहेत. जिल्हाधिकाऱ्यांनी थेट अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणाबद्दल त्यांच्यावर गुन्हे दाखल करत अकोलेकरांच्या आरोग्याची काळजी घेण्याची गरज आहे.

### घंटागाडीची वसुली देखील नियमबाह्य

घंटागाडी चालकांकडून घरगुती कचरा आणि व्यावसायिक कचरा उचलण्यासाठी अव्वाच्या सव्वा दरांची मागणी केली जात आहे. एकीकडे कर भरूनही कचरा उचलण्यासाठी ग्राहकांना वेठीस धरले जात असून, दुसरीकडे महापालिकेचे यावर कोणतेही नियंत्रण राहिलेले नाही, असे चित्र दिसत आहे. महापालिका खाजगी एजन्सीला महिन्याला लाखो रुपये देत असून दूसरीकडे या एजन्सी मार्फत वसुलीच्या निर्धारित रक्कमेपेक्षा अधिकची रक्कम वसुल करत आहे.



अनुसूची - 1
भाग अ - उपयोगकर्ता शुल्क

| अ.क्र. | वर्गवारी | क व ड वर्ग महानगरपालिका (रक्कम रुपये प्रतीमाह) |
| --- | --- | --- |
| | धनकचरा निर्मीती 100 किलोग्राम पेक्षा कमी | |
| 1 | प्रती घर | 50 |
| | व्यवसायीक आस्थापना | |
| 2 | दुकाने, दवाखाने इत्यादी | 60 |
| 3 | शोरुम (उपकरणे/फर्निचर/ऑटोमोबाईल/इलेक्ट्रॉनिक्स इ.) | 120 |
| 4 | गोदामे | 120 |
| 5 | उपहारगृह व हॉटेल | 120 |
| 6 | राहण्याची व जेवणाची व्यवस्था असणारी हॉटेल | 160 |
| | रुग्णालये | |
| 7 | पन्नास खाटांपेक्षा कमी | 120 |
| 8 | पन्नास खटांपेक्षा जास्त | 180 |
| | संस्था | |
| 9 | शैक्षणिक संस्था वसतिगृह | 90 |
| 10 | धार्मिक संस्था | 90 |
| 11 | शासकिय/निमशासकिय कार्यालये | 90 |
| 12 | विवाह कार्यालये/मनोरंजन सभागृह/एक पडदा चित्रपटगृहे | 1000 |
| 13 | खरेदी केंद्रे / बहुपडदा चित्रपटगृहे | 1500 |
| 14 | फेरीवाले | 150 |
| 15 | हंगामी दुकाने किंवा आनंद मेळा /सत्संग / खादय महोत्सव / फटाक्याचे दुकान | महानगरपालिकेने मासिक शुल्क न आकारता एक वेळ शुल्क निर्धारीत करावे (मनपा व्दारे निर्धारीत करुन देण्यात येईल) |

### डंपिंग ग्राऊंडवर आरोग्याचा खेळ

शहरातील कचरा संकलित करून जेथे टाकला जातो, त्या डंपिंग स्टेशनवर तर अत्यंत विदारक आणि भयावह चित्र पाहायला मिळत आहे. नियमानुसार मेडिकल वेस्टची (वैद्यकीय कचरा) विल्हेवाट लावण्याची स्वतंत्र आणि सुरक्षित पद्धत असताना, हा घातक कचरा उघड्यावर टाकला जात आहे. या डंपिंग ग्राऊंडवर महिला, लहान मुले अत्यंत असुरक्षित वातावरणात 'मेडिकल वेस्ट'मधून प्लास्टिक आणि इतर वस्तू वेचताना दिसत आहेत. रक्ताने माखलेले कापूस, वापरलेल्या सुया आणि घातक औषधांच्या कचऱ्यात ही मुले वावरत असल्याने शहरात नवीन आणि गंभीर आरोग्य समस्या निर्माण होण्याची भीती वर्तवली जात आहे.



**व्यावसायिक लूट:** घंटागाडीच्या माध्यमातून जास्तीच्या पैशांची मागणी.

**असुरक्षित डंपिंग:** लहान मुलांकडून मेडिकल वेस्टमध्ये कचरा वेचण्याचे काम सुरू.

**प्रशासकीय चुप्पी:** महापालिका आणि प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अक्षम्य दुर्लक्ष.

# आई-वडील मजूरीला गेले अन् घडलं भयानक

## 60 वर्षीय शेजाऱ्याने केला अल्पवयीन मुलीवर बलात्कार



प्रतिनिधी ६ मे

**अकोला :** महाराष्ट्रात महिला आणि मुलींविरोधातील वाढत्या गुन्ह्यांनी पुन्हा एकदा माणुसकीला काळिमा फासला आहे. राज्य अद्याप बदलापूर आणि नसरापूरच्या घटनांमधून सावरलेले नसतानाच, अकोला जिल्ह्यातील पातुर तालुक्यातून एक हृदयद्रावक घटना समोर आली आहे. येथील चान्नी पोलीस स्टेशनच्या हद्दीतील एका गावात ६० वर्षीय वृद्धाने आपल्या शेजारी राहणाऱ्या १० वर्षांच्या निष्पाप मुलीवर अत्याचार केला.

मिळालेल्या माहितीनुसार, पीडित मुलीचे आई-वडील शेतमजूर असून ते नेहमीप्रमाणे कामासाठी शेतात गेले होते. याच संधीचा फायदा घेत शेजारी राहणाऱ्या आरोपी वृद्धाने गेल्या ४-५ दिवसांपासून मुलीला धमकावून तिच्यावर वारंवार बलात्कार केला. निष्पाप मुलगी भीतीपोटी शांत होती, मात्र जेव्हा अत्याचाराची हद्द पार झाली, तेव्हा तिने धीर एकवटून आपल्या आई-वडिलांना घडलेला प्रकार सांगितला. काल (५ मे) संध्याकाळी नातेवाईकांनी तातडीने चान्नी पोलीस स्टेशन गाठून तक्रार नोंदवली. घटनेचे गांभीर्य ओळखून पोलिसांनी आरोपीविरुद्ध संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. मात्र, पोलीस पोहोचण्यापूर्वीच आरोपी फरार होण्यात यशस्वी झाला. याप्रकरणी पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांनी सांगितले की, 'आरोपी आणि पीडित कुटुंब शेजारी होते आणि त्यांच्यात चांगले संबंध होते, असे असूनही आरोपीने इतके घृणास्पद कृत्य केले. आम्ही चान्नी पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल केला असून आरोपीच्या शोधासाठी पोलिसांची तीन ते चार पथके रवाना केली आहेत. तो जवळच्या जंगलाच्या दिशेने पळाल्याची माहिती मिळाली असून, आम्ही त्याला लवकरच अटक करू. सध्या परिसरात परिस्थिती नियंत्रणात असून नागरिकांनी शांतता राखली आहे.' या घटनेनंतर पातुर तालुक्यात प्रचंड संताप व्यक्त केला जात आहे. स्थानिक रहिवाशांनी आरोपीला कठोर शिक्षा देण्याची मागणी केली आहे. पोलीस प्रशासनाने नागरिकांना संयम राखण्याचे आवाहन केले असून आरोपीला शोधून काढण्याचे आश्वासन दिले आहे.

# ट्रक-बस समोरासमोर भीषण धडक

## चालक गंभीर, १६ प्रवासी जखमी

प्रतिनिधी ६ मे

**यवतमाळ :** आर्णी येथील सातारा फाटा जवळ आज प्रवासी घेणाऱ्या बस आणि ट्रकचा समोरासमोर भीषण अपघात झाला. ही घटना आज बुधवारी सकाळी घडली. या अपघातात बसचा चालक गंभीर जखमी झाला असून १६ प्रवासी किरकोळ दुखापतीसह रुग्णालयात दाखल करण्यात आले आहेत.

घटनास्थळी माहिती मिळाल्यानुसार, ट्रक भरधाव वेगाने येत असताना तो बसच्या समोर आला. धडक इतकी जबरदस्त होती की बसचा चालक स्टेरिंगमध्ये अडकला. नागरिकांनी त्वरित हस्तक्षेप करत चालकाला बाहेर काढले आणि तातडीने जवळच्या रुग्णालयात उपचारासाठी हलवण्यात आले. अपघातानंतर ट्रक चालक ठिकाणी उपस्थित राहिला नाही, तर स्थानिक पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून परिस्थिती नियंत्रणात आणली. जखमी प्रवाशांमध्ये प्रविण विजयकुमार समतपुरे (४६, यवतमाळ), अमन सुरज राठोड (२४, पुसद), ओंकार देवराव पिसांडे (४३, धावंडा), आसिया सुलताना अब्दुल सत्तार (५०, वाशिम), प्रभा करवते (६५, मेहेकर), अशरफ बी अब्दुल लतीन (६०, यवतमाळ) यांसह एकूण १६ प्रवासी आहेत. सर्व प्रवाशांना प्राथमिक उपचार दिल्यानंतर रुग्णालयात राहून आवश्यक तपासण्या सुरू आहेत. या घटनेची माहिती मिळताच आर्णी पोलिसांनी घटनास्थळ गाठुन मदत कार्य केले.

# एस.टी. कर्मचाऱ्यांना मिळाल्या गाद्या आणि कुलर !

## बसस्थानकातील विश्रांतीगृहाचा कायापालट विदारक परिस्थितीतून वाहक-चालकांची सुटका

प्रतिनिधी ६ मे




**अकोला:** कडक उन्हात प्रवाशांची सेवा करणाऱ्या एस.टी. वाहक आणि चालकांच्या हालअपेष्टांबाबत 'सिटी न्यूज सुपरफास्ट' ने प्रकाशित केलेल्या बातमीची प्रशासनाने गंभीर दखल घेतली आहे. बातमीचा सकारात्मक परिणाम होऊन बसस्थानकातील मुख्यालयात कर्मचाऱ्यांसाठी आता नवीन गाद्या आणि कुलरची व्यवस्था करण्यात आली आहे. यामुळे अनेक दिवसांपासून जमिनीवर सतरंजी टाकून झोपणाऱ्या कर्मचाऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.राज्यात उन्हाचा पारा वाढत असताना एस.टी. महामंडळाचे वाहक आणि चालक बसस्थानकातील विश्रांतीगृहात अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत विश्रांती घेत होते. अंगाची लाहीलाही करणाऱ्या उन्हात या कर्मचाऱ्यांना साध्या पंख्याचीही नीट सोय नव्हती. अनेक कर्मचारी जमिनीवर सतरंजी पसरून झोपत असल्याचे चित्र 'सिटी न्यूज सुपरफास्ट'ने आपल्या बातमीतून मांडले होते. या विदारक परिस्थितीमुळे कर्मचाऱ्यांच्या आरोग्याचा प्रश्नही निर्माण झाला होता. ही बातमी समाजमाध्यमांवर आणि सर्वत्र चर्चेचा विषय ठरल्यानंतर एस.टी. प्रशासनाने तातडीने हालचाली केल्या.

### कर्मचाऱ्यांकडून आभार

'आम्ही रात्रंदिवस प्रवाशांची ने-आण करतो, पण आम्हाला किमान झोपण्यासाठी गादी आणि पिण्याचे पाणीही वेळेवर मिळत नव्हते. सिटी न्यूजने आमचा आवाज प्रशासनापर्यंत पोहोचवला, त्याबद्दल आम्ही त्यांचे ऋणी आहोत,' अशा भावना अनेक वाहक आणि चालकांनी व्यक्त केल्या आहेत.

# महान प्रकल्पात केवळ ३१.६७ टक्के जलसाठा

प्रतिनिधी ६ मे



**अकोला:** अकोला जिल्ह्यातील उन्हाचा पारा सातत्याने वाढत आहे. परिणामी अकोला जिल्ह्यातील लघु तसेच मध्यम प्रकल्पावर पडत आहे. अकोला शहर मूर्तिजापूर तसेच इतर ठिकाणी पाणीपुरवठा करणाऱ्या काटेपूर्णा धरणाच्या पाणी पातळीत मोठ्या प्रमाणात घसरण होत आहे.

सातत्याने वाढत असलेल्या उन्हाच्या पाऱ्यामुळे काटेपूर्णा म्हणजेच महान धरणातील पाण्याचे बाष्पीभवन होत असल्याने महान धरणातील पाणी पातळी गेल्या दहा ते पंधरा दिवसापासून चांगलीच कमी झाली आहे. पाटबंधारे विभागाने दिलेल्या माहितीनुसार महान धरणांमध्ये केवळ ३१.६७ टक्के एवढाच जलसाठा शिल्लक राहिला आहे. पावसाळ्याला आणखीन दीड महिने बाकी आहे, त्यातच महान धरणामध्ये ३१.६७ टक्के जलसाठा सध्या उपलब्ध असल्याने अकोला तसेच मुर्तीजापुर येथील नागरिकांसमोर पाणी प्रश्न उपस्थित राहणार असल्याची शक्यता आहे. अकोला जिल्ह्यातील इतर प्रकल्पात सुद्धा मोठ्या प्रमाणात जलसाठा सतत कमी होत आहे. यामध्ये तेल्हारा तालुक्याला पाणीपुरवठा करणाऱ्या वान प्रकल्पात केवळ ४९.२२ टक्के, बार्शीटाकळी तालुक्यातील दगडपारवा प्रकल्पात ५९.४७ टक्के, पातुर तालुक्यातील मोरणा प्रकल्पात ४४.९५ टक्के, निर्गुणा प्रकल्पात २१ टक्के, मूर्तिजापूर तालुक्यातील उमा प्रकल्पात ८.३८ टक्के जलसाठा उपलब्ध आहे. येणारे काही दिवस नागरिकांनी पाण्याचा वापर हा काटकसरीने करावा अन्यथा पाणी टंचाईला सामोरे जावे लागणार असल्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

## आता टोल नाक्यावर मिळणार ताजी भाजी

**मुंबई:** राज्यातील शेतकऱ्यांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी आणि त्यांच्या शेतमालाला थेट ग्राहकांपर्यंत पोहोचवण्यासाठी राज्य सरकारने एक अभिनव योजना आखली आहे. राज्यातील सर्व प्रमुख रस्ते आणि महामार्गांवरील टोल नाक्यांच्या परिसरात आता सुसज्ज 'कृषी मॉल' उभारण्याचा निर्णय सार्वजनिक बांधकाम विभागाने घेतला आहे. या निर्णयामुळे शेतकऱ्यांना आपला माल विकण्यासाठी लांबच्या बाजारपेठांवर अवलंबून राहावे लागणार नाही, तर महामार्गावरून प्रवास करणाऱ्या हजारो प्रवाशांना थेट शेतातून आलेली ताजी फळे आणि भाजीपाला खरेदी करता येणार आहे.

# आता तलाठी भरती एमपीएससी द्वारे...

प्रतिनिधी ६ मे

**मुंबई :** तलाठी भरतीची वाट पाहणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी राज्य सरकारकडून आनंदाची बातमी समोर आली आहे. तब्बल १७०० पदांसाठी तलाठी भरती होणार असून, प्रशासनाने सर्व विभागीय आयुक्तांना ८ मेपर्यंत मागणीपत्र सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. विशेष म्हणजे ही भरती प्रक्रिया एमपीएससीमार्फत घेतली जाणार असल्याचा मोठा निर्णय घेण्यात आला आहे.दरम्यान, महाराष्ट्र सरकारने सरळ सेवा भरती प्रक्रियेत महत्त्वपूर्ण बदल केला आहे. आता सरळसेवेतील पदेही एमपीएससीच्या माध्यमातून भरली जाणार आहेत. पारदर्शकता वाढवण्यासाठी घेतलेल्या या निर्णयामुळे राज्यातील हजारो स्पर्धा परीक्षेच्या विद्यार्थ्यांना दिलासा मिळणार आहे.सरळसेवेमधील सुमारे ४६ पदांचा समावेश या प्रक्रियेत करण्यात आला असून, शिक्षक आणि पोलिस भरतीला मात्र यामधून वगळण्यात आले आहे. या संदर्भातील शासन निर्णय (जीआर) ५ मे रोजी जारी करण्यात आला आहे. याशिवाय, गट ब, गट क आणि गट ड पदांसाठी घेतली जाणारी मुलाखतही रद्द करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट विविधा

बुधवार, दि. ६ मे २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# भूगर्भातील पाणी ; काळाची गरज आणि जलपुनर्भरण आवश्यकता

आजच्या काळात 'पाणी हेच जीवन' हे वाक्य आपण केवळ ऐकतो, पण त्यामागचे गांभीर्य लक्षात घेत नाही. वाढते शहरीकरण, लोकसंख्या विस्फोट आणि निसर्गाचे बदललेले चक्र यामुळे पाण्याची टंचाई ही एक जागतिक समस्या बनली आहे. यावर सर्वात प्रभावी उपाय म्हणजे 'जलपुनर्भरण'.

जलपुनर्भरण म्हणजे काय?

पावसाचे पाणी जमिनीवर पडल्यानंतर ते वाहून जाऊ न देता शास्त्रीय पद्धतीने जमिनीमध्ये जिरवण्याच्या प्रक्रियेला 'जलपुनर्भरण' म्हणतात. यामुळे भूगर्भातील पाणीपातळी वाढण्यास मदत होते.

जलपुनर्भरणाची आवश्यकता का आहे.

खालावलेली पाणीपातळी: बोअरवेल आणि विहिरींच्या अतिवापरामुळे जमिनीतील पाण्याचा उपसा वाढला आहे. परिणामी, पाणीपातळी शेकडो फूट खोल गेली आहे. ती पुन्हा वर आणण्यासाठी पुनर्भरण गरजेचे आहे.

**पावसाची अनिश्चितता:** हवामान बदलामुळे कधी अतिवृष्टी होते तर कधी दुष्काळ पडतो. पावसाचे पाणी साठवून ठेवल्यास टंचाईच्या काळात त्याचा वापर करता येतो.

**पाण्याचा दर्जा सुधारणे:** जमिनीखाली पाणी जिरल्यामुळे मातीचे नैसर्गिक थर गाळणीचे काम करतात, ज्यामुळे पाण्याची शुद्धता वाढते आणि क्षारता कमी होते.

**शहरीकरण आणि सिमेंटचे रस्ते:** शहरांमध्ये सगळीकडे सिमेंटचे रस्ते आणि बांधकामे झाल्यामुळे पावसाचे पाणी जमिनीत मुरायला जागा उरलेली नाही. हे पाणी थेट गटारात वाहून जाते, ते थांबवण्यासाठी रेन वॉटर हार्वेस्टिंग आवश्यक आहे.



जलपुनर्भरणाच्या प्रमुख पद्धती.

**छतावरील पाणी जिरवणे :** घराच्या छतावर पडणारे पावसाचे पाणी पाईपद्वारे विहिरीत किंवा खास तयार केलेल्या शोषखड्ड्यात सोडणे.

**शोषखड्डा :** पावसाचे पाणी साचवून ते जमिनीत मुरवण्यासाठी दगड, गोटे आणि वाळूचा वापर करून तयार केलेला खड्डा.

विहीर पुनर्भरण: शेतातील किंवा परिसरातील पाणी गाळून थेट विहिरीत सोडणे.

**नाला बंडींग:** ओढे किंवा नाल्यांवर छोटे बंधारे बांधून पाणी अडवणे व जिरवणे.

'पाणी अडवा, पाणी जिरवा' हा केवळ सरकारी नारा न राहता ती प्रत्येक नागरिकाची जबाबदारी बनली पाहिजे. जर आपण आज पाणी जमिनीत मुरवले, तरच उद्याची पिढी सुरक्षित राहील. जलपुनर्भरण हा केवळ तांत्रिक विषय नसून ते एक लोकचळवळ बनणे काळाची गरज आहे.

***चला, आजच संकल्प करूया – पावसाचा प्रत्येक थेंब जमिनीत जिरवूया!***

# येता- जाता वास्तववादी कवितासंग्रह




येता जाता हा नवकवी कैलास सोळंके लिखित कविता संग्रहाचे नुकतेच थाटात प्रकाशन संपन्न झाले . कविता संग्रह पुस्तकात समाजातील वास्तव स्थितीच्या अनुभवातील ५९ काव्यरचनेचा समावेश कवींनी केला आहे .नवकवी कैलास सोळंके यांना समाजात प्रत्यक्षात वावरण्याची मोठी संधी शैक्षणिक माध्यमातून तळघरापर्यंत पोहोचत असल्याने प्रत्येक काव्याची धार ज्वलंत स्वरूपात उभी दिसून येते . ओल ,बाजार सांजवेळी,अनुराग चाल , सफाई , लोकशाही , किल्ली , प्रकाशाच प्रकाश या काव्यरचनेतून सामाजिक भावनिकता प्रगट होते तर बिनधास्त , आभास, आरपार , रान भुल ,बळजबरी,दुखरी नस , कजमाफी,कहाणी, खरे बोला , अच्छेदिन, पहिल्या पावसाने ,या काव्यरचनेतून कवीने सामाजिक वातावरण प्रकट केले आहे . भावनेच्या भरात,साधी भोळी ,. सत्कार ' पाऊस,डोळे मिटून , जगून घे ,निभाव ,धुळवड ,माझे मन , खरा गृहस्थ ,घाव, हसण्यासाठी,बोलता येईना , भंगलेला,साथ कोरोनाची, खबरभात,कमाल झाली ,भावनेच्या भरात , आभास , माणसाची गोष्ट , मिळवत, अर्धी भूक, मृत्यु सर्वांग सोहळा या मार्मिक रचनेव्दारे व्यक्तीच्या हातातील कार्याचा दर्जा कवीने दर्शविला पंढरी , अभंगाची लक्षणे , राधेश्याम , कापूर , म्हणत होता , माझे मन, देखल्या देवा दंडवत ,. एकटी राधा या व्यापक रचनेव्दारे , धार्मिक कार्यातील आचरणाचा बोध प्रेक्षकासमक्ष सादर झाला. तर शेवटच्या टप्पातील येता जाता रचनेतून व्यवसायधारक लोहर, शेतकरी, यांच्या व्यवसायातुन कार्याची तत्परता प्रगट करीत , सैनिकाच्या कार्यातुन देशप्रेम दिसून येते . साहित्याच्या एकमेकाशी संगत हिच पुस्तकांच्या कार्यातील कौशल्यता दर्शविते . नेहमीच्या निरीक्षणात कैलास साळुंके यांनी ङयेता जाताङ तील शब्द फुलवणे - हे वास्तव स्वरूप काव्य रचनेतून प्रगट केल्यांचे प्रकर्षाने वाचकाला जाणवते . कैलास सोळंके हे नवकवी अनेक वर्षापासून शैक्षणिक कार्यात कार्यरत असल्याने प्रशासन स्तरापासून ग्रामीण विभागातील वास्तव स्थिती त्यांच्या नियमित कार्याच्या जबाबदारी ने न्याहळत असतात यामुळे त्यांचा विदयार्थी सह प्रशासनाला उचित कार्याचा मागदर्शन करण्याचा हातखंडा झाला आहे . क्रिडा - सांस्कृतिक कार्याची धूरा गत दहावर्षा पासुन सोळंके सर सांभाळत असल्याने सांस्कृती चे रक्षण व संवर्धन हे त्यांचा कार्यात्मक पद्धतीने होत आहे ..

येता जाता काव्यसंग्रहाचे समिक्षण करताना कवीच्या अंत: मनातील रचनेव्दारे समाज जीवनातील भविष्यायाचा वेध घ्यावयास लागत असून समाजाला वास्तवाचे दर्शन काव्यसंग्राहातील प्रत्येक रचनेतुन प्रगट होत असल्याने बोधात्मक समाज जागृती होणार आहे

येता जाता या काव्यसंग्राहाच्या रचनात्मक प्रगटीकरणा करीता कवीला दोन - तीन वर्षाचा कालावधी लागला असल्याने काव्यरचनेचा उच्चदर्जा दर्शविते.

ज्ञानेश्वर मांडेकर
समीक्षक तथा
अध्यक्ष माऊली फांउडेशन

# महापुरुषांच्या अस्मितेसाठी बहुजनांचा जागर !

समाजाच्या चेतनेला दिशा देणाऱ्या महापुरुषांविषयी होत असलेल्या अवमानकारक वक्तव्यांच्या पार्श्वभूमीवर बहुजन समाजात तीव्र संतापाची लाट उसळली असून, या असंतोषाला संघटित आणि सकारात्मक अभिव्यक्ती देण्यासाठी बहुजन समाज जागृती महासंघाच्या वतीने जाहीर निषेध सभेचे आयोजन करण्यात आले आहे. गुरुवार, ०७ मे २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता, नवीन बस स्टॅन्डजवळील प्रमिलाताई ओक हॉल अकोला येथे ही सभा पार पडणार आहे.

महाराष्ट्राच्या अस्मितेचे प्रतीक असलेले छत्रपती शिवाजी महाराज, स्त्रीशिक्षणाची क्रांती घडविणाऱ्या सावित्रीबाई फुले, सामाजिक समतेचा पाया रचणारे महात्मा ज्योतिराव फुले आणि भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महान विभूतींबद्दल अलीकडील काळात काही व्यक्तींनी केलेल्या वक्तव्यांनी समाजमन व्यथित झाले आहे. इतिहासाचे विकृतीकरण आणि महापुरुषांच्या कार्याची अवहेलना हा केवळ शब्दांचा प्रश्न नसून, तो समाजाच्या मूल्यव्यवस्थेवर आघात करणारा गंभीर प्रकार आहे, अशी भावना नागरिकांत व्यक्त होत आहे.

नागपूर जिल्ह्यातील एका कार्यक्रमात केलेले आक्षेपार्ह विधान असो किंवा संविधान निर्मितीबाबत केलेले भ्रामक दावे या सर्व घटनांनी समाजातील सजग घटकांना एकत्र येण्यास भाग पाडले आहे. महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांच्याबद्दलही करण्यात आलेल्या अवमानकारक वक्तव्यांनी संताप अधिकच तीव्र केला आहे. अशा प्रवृत्तींना वेळीच रोखण्यासाठी आणि महापुरुषांच्या विचारांचे संरक्षण करण्यासाठी ही निषेध सभा एक निर्णायक पाऊल ठरणार आहे.

या सभेच्या माध्यमातून केवळ निषेध नोंदविणे नव्हे, तर समाजात जागरूकता निर्माण करून सत्य इतिहासाची जपणूक करण्याचा संकल्प करण्यात येणार आहे. विविध बहुजन संघटना, सामाजिक चळवळी तसेच जागृत नागरिक या व्यासपीठावर एकत्र येऊन पुढील दिशा ठरविणार आहेत.

ज्येष्ठ समाजसेवक गजानन हरणे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे सर्व अकोलकर नागरिकांना, बहुजन बांधवांना आणि विविध सामाजिक संघटनांना कुटुंबासह या सभेला उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे. 'महापुरुषांचा सन्मान हीच खरी समाजाची ओळख आहे; त्यांच्या विचारांचे रक्षण करणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे,' असे ते म्हणाले.आजच्या या निर्णायक टप्प्यावर समाजातील प्रत्येक सजग नागरिकाने आपली भूमिका स्पष्ट करून एकजूट दाखविण्याची गरज आहे. ही निषेध सभा केवळ विरोधाची नव्हे, तर विचारांची मशाल पेटविण्याची संधी ठरेल, यात शंका नाही. असेही शेवटी समाजसेवक गजानन हरणे यांनी म्हटले आहे.

# गणितज्ञ श्रीनिवास रामानुजन यांची प्रतिभा धार्मिकता आध्यात्मिकता आणि त्यांचे कर्तृत्व यांच्यातील नाते

*थोर भारतीय गणितज्ञ श्रीनिवासन रामानुजन यांची सर्जनशीलता अलौकिक होती. सर्जनशीलता, म्हणजे असलेल्या माहितीचा वापर करून काहीतरी 'नवीन' आणि 'उपयुक्त' निर्माण करण्याची क्षमता. ती जिज्ञासा, सराव आणि अनुभव यांच्या आधारे वाढवता येते. तर प्रतिभा ही सर्जनशीलतेच्या पुढची पायरी आहे. ती सहसा 'जन्मजात' किंवा 'सहज' असते. हे असे कसे ? याचे उत्तर 'अध्यात्म पूर्वसुकृत' असे सांगते. याची अनेक उदाहरणे विविध क्षेत्रांत पहायला मिळतात. त्या त्या क्षेत्रांचा अल्प स्पर्श त्यांची प्रतिभा व्यक्त होण्यास पुरेशी असते. 'प्रज्ञा' हे केवळ बुद्धीचे कार्य नसून ते 'सत्याचे थेट दर्शन' आहे. जेव्हा एखाद्या ऋषींना विश्वाचा एखादा मूलभूत नियम अचानक 'दिसतो', ती प्रज्ञा. 'प्रज्ञा' शब्दाला इंगजी प्रतिशब्द सांगणे कठीण आहे.*



सर्जनशीलता, प्रतिभा आणि प्रज्ञा यांतील अंतर समजणे का महत्त्वाचे ? यांतील प्रज्ञा असणारी व्यक्ती दुर्लभ असल्याने सर्जनशीलता आणि प्रतिभा हे तरी नक्कीच समजून घ्यायला हवे. सर्जनशीलता जोपासायला हवी, प्रोत्साहित करायला हवी. या ३ गोष्टी व्यक्तीच्या अभिव्यक्तीचा स्तर पालटवतात. व्यक्तीमत्त्वासाठी आपल्यातील सर्जनशीलता जशी जोपासायला हवी, तशी प्रतिभा दुर्लक्षित करू नये. अर्थात् दोन्हींसाठी हिंदु धर्म-अध्यात्म हे पूरक ठरते. हे समजले, तर 'अध्यात्म विरुद्ध विज्ञान' असे न होता 'अध्यात्म आणि विज्ञान असे समीकरण' जीवनात लाभकारी ठरते. संशोधनाच्या क्षेत्रात तर हे टप्पे पुष्कळच महत्त्वाचे ठरतात. जगावर मोठा प्रभाव टाकेल, असे शुद्ध गणित, शुद्ध भौतिकशास्त्र इत्यादींचे संशोधन प्रतिभेच्या टप्प्यापासून चालू होते.

रामानुजन यांची गणिती प्रतिभा आणि आध्यात्मिक व्यक्तीमत्त्व यांची सांगड आणि रामानुजन यांच्या संशोधनाचा धार्मिकता आणि आध्यात्मिकता यांच्याशी संबंध काय, हे पाहूया. पारंपरिक धार्मिकतेमुळे एकाग्रतेचा लाभ : रामानुजन यांची वाढ एका पारंपरिक धार्मिक वातावरणात झाली होती. मंत्रपठण, स्तोत्रे आणि एकाग्रतेची सवय यांमुळे त्यांच्या मेंदूला नकळत एक प्रकारचे वेगळे 'प्रशिक्षण' मिळाले होते. याने मेंदू लवचिक बनतो (न्यूरोप्लास्टिसीटी). यांत मेंदूतील संदेशवाहक चेतातंतूंचे जाळे (व्हाईट मॅटर) अधिक विकसित होते. रॉबर्ट कनिगेल यांनी परिश्रमपूर्वक 'दी मॅन हू न्यू इन्फिनिटी' हे रामानुजन यांचे उत्तम चरित्र लिहिले आहे. त्यात रामानुजन यांच्या आध्यात्मिक श्रद्धेचा त्यांच्या गणिती प्रक्रियेशी असलेला संबंध स्पष्टपणे मांडला आहे. कानिगेल यांनी 'मनाचे ब्राह्मण्य प्रशिक्षण या संज्ञेचा वापर करून वर उल्लेखित एकाग्रतेच्या परंपरेचे महत्त्व सांगितले आहे. रामानुजन यांचे अध्यात्म त्यांना विश्वातील सुसंवाद किंवा 'सिमेट्री शोधण्यास साहाय्य करत असे. ते म्हणायचे, 'ईश्वराचा विचार व्यक्त केल्याविना कोणत्याही समीकरणाला माझ्यासाठी अर्थ नाही. विश्व हे ईश्वराची विभूती असे श्रीकृष्णाने गीतेत 'विभूतीयोगा'त सांगितले आहे.' रामानुजन यांचा ईश्वर हा सनातन धर्मातील असून तो सर्वव्यापी, सर्वज्ञानी आहे. येथे सर्वव्यापी, म्हणजे जो विश्वनिर्मितीकर्ताही आहे, तसाच तो विश्वनिर्मितीची सामग्रीही आहे. तो विश्वापासून वेगळा नाही. याचा अर्थ रामानुजन यांच्यातही (अगदी वाचकामध्येही) तो आहेच. केवळ प्रतिभा आणि प्रज्ञा यांमुळे त्याची अभिव्यक्ती स्पष्ट होते. 'रामानुजन यांच्या 'ब्रह्म', शून्य आणि अनंत, माया, जीवनध्येय यांसंबंधीच्या संकल्पना सनातन धर्माच्या तत्त्वज्ञानाच्या अभ्यासाने बालपणापासून प्रगल्भ बनल्या होत्या. रामानुजन यांना मानवाला आज ज्ञात झालेल्या कृष्णविवर आदींची गणिते आधीच दिसली, तर त्यात नवल वाटायला नको. प्रश्न असतो तो, 'जे दिसते ते सत्य म्हणून स्वीकारण्याचा.' रामानुजन यांना त्यात ईश्वरच सापडल्याने आणि तोच सत्यतेचे प्रमाण असल्याने त्यांना त्याची सत्यता वेगळी सिद्ध करायची आवश्यकताच नाही. याला 'अंतर्दृष्टी' म्हणतात. प्रा. ई.टी. बेल सांगतात, 'रामानुजन यांची अंतर्दृष्टी अलौकिक होती. ती म्हणजे स्वर्गीय भेट आहे.' प्रा. हार्डी सांगतात, 'गणितज्ञाकडे दूरवर (खोलवर) पहाता येण्यासाठी एक तटस्थ दृष्टी असायला हवी. रामानुजन यांच्याकडे ती होती.' हे वैशिष्ट्य विदेशी संशोधकांशी त्यांची तुलना करतांना महत्त्वाचे ठरते. त्यातही रामानुजन यांची अवस्था अहंशून्य होती.' 'सर्व स्वप्नात देवीमुळे समजले' या प्रतिपादनातून, त्यांच्या अंतर्बाह्य साधेपणातून, तसेच अन्य गोष्टींतून लक्षात येते.

### प्रतिभेकडून प्रज्ञेकडे जाण्याची सहजसाधना

रामानुजन हे प्रतिभावान होते, याची चुणूक शालेय जीवनातील घटनांतून स्पष्ट लक्षात येते. कितीही अडचणी आल्या, तरी गणिताचा ध्यास असणे, तसेच धार्मिकता न सोडणे, या एकाच नाण्याचा दोन बाजू झाल्या. साधकत्वाच्या दृष्टीने ठरवलेल्या मार्गाची स्पष्टता आणि मार्गक्रमण करण्याची जिद्द यांतून दिसते. मग या प्रतिभावानाचा प्रवास प्रज्ञेकडे कधी पूर्ण झाला, हे समजलेसुद्धा नाही. त्यांना वाटते, तर गणिताप्रमाणेच अन्य विषयांकडे लक्ष देऊन पदवी प्राप्त करून ते मोठे अधिकारी बनू शकले असते. रामानुजन यांच्या घरच्यांच्या मनात ते आले; परंतु त्यांच्या मनाला ते शिवलेही नाही, हे वैराग्य नव्हे काय ?


### शब्दपूर्व पारखाची विलक्षण क्षमता :

बहुतांश गणितज्ञांना तर्क मांडत जात अंतिम निष्कर्षाला पोचल्यावर समाधान मिळते, आनंद होतो. रामानुजन यांना अंतिम टप्प्याला ते थेट तेथेच पोचत असल्याने लगेच मिळत असे. अन्य कुणाला नवीन सुचलेले समीकरण किंवा सूत्र आतापर्यंत जे ठाऊक आहे, त्यापेक्षा वेगळे काही तरी असेल, तर सामान्यतः व्यक्तीची बुद्धी प्रश्न उपस्थित करते आणि जे दिसते ते बुद्धीला पटत नसेल, तर उत्पन्न होताच फेटाळले जाते. रामानुजन यांचे मन इतके मोकळे होते की, बाकीच्यांना त्यांच्या तर्कशुद्धतेमुळे जे स्वीकारले जाणार नाही, ते रामानुजन सहज स्वीकारू शकत असत. हे त्यांच्यातील धार्मिक श्रद्धेशी समांतर आहे. जे दिसले त्याची सत्यता त्यांना स्वतःला पटवावी लागत नसे. तर्क हा शब्दांना धरून चालतो. येथे तो नाहीच म्हणून याला 'शब्दपूर्व पारख' म्हणतात. रामानुजन यांची ही क्षमता विलक्षण होती. हिंदू धर्म-अध्यात्म संशोधनाच्या विरोधात तर नाही, उलट पूरक आहे, हे सर्वांना स्पष्ट व्हावे, ही परमात्म्याला प्रार्थना ! रामानुजन यांच्या गणितातील कार्याविषयी ते ईश्वरीय कसे हे लिहिण्याचा प्रयत्न करणे, हेही त्यांच्या विचारांना धरूनच झाले. त्यामुळे त्या प्रतिभेची स्तुती हे ईशसंकीर्तन. गीतेमध्ये भगवंताने त्याची विभूती कशी ओळखावी ? हे सांगितलेले आहे. ती संज्ञा रामानुजन यांच्या संशोधनाला लागू पडते. त्यामुळे आज श्रीकृष्ण परमात्म्याने 'विभूतीयोग' परत सांगितला, तर तो त्यात 'गणितज्ञांमध्ये मी रामानुजन', असे नक्की म्हणेल !

डॉ. दुर्गेश सामंत
गोवा

## दिन विशेष — छत्रपती शाहू महाराजांचा स्मृती दिन

कोल्हापूर संस्थानाचे पुरोगामी राजे आणि महान समाजसुधारक राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचा आज स्मृतिदिन. ६ मे १९२२ रोजी मुंबईत त्यांचे निधन झाले. त्यांनी अस्पृश्यता निवारण, शिक्षण प्रसार आणि आरक्षणाचे जनक म्हणून ऐतिहासिक कार्य केले, म्हणूनच त्यांच्या स्मृतीस आदरांजली वाहण्यासाठी हा दिवस महत्त्वाचा आहे.



छत्रपती शाहू महाराज यांनी कोल्हापूर संस्थानात शिक्षणासाठी सवलती, शेतकऱ्यांसाठी धरणे आणि मागासवर्गीयांना ५० टक्के आरक्षण लागू केले. त्यांच्या जनहिताच्या कार्यामुळे त्यांना 'राजर्षी' आणि 'लोकराजा' म्हणून ओळखले जाते. महात्मा फुले यांच्या विचारांचे पाईक म्हणून त्यांनी सामाजिक समतेसाठी आयुष्य वेचले. ६ मे रोजी संपूर्ण महाराष्ट्रात त्यांच्या सामाजिक न्याय, शिक्षण आणि समतेच्या विचारांचे स्मरण केले जाते. छत्रपती शाहू महाराजांनी समतेसाठी केलेले कार्य तसेच न्यायाची भूमिका सदैव प्रेरणा देणारी आहे. सामाजिक समतेसाठी छत्रपती शाहू महाराजांनी आयुष्य वेचले. समाजातील कुरितींना विरोध केला. आज देखील त्यांचे विचार समाजाला मार्ग दाखवण्याचे काम करीत आहेत. लोक कल्याणकारी राजा म्हणून इतिहासात त्यांनी स्थान प्राप्त केले आहे.

**शाहू महाराजांना स्मृती दिनी विनम्र अभिवादन.**

तेजस्विनी महाराष्ट्र ग्रामीण महिला उद्यम विकास प्रकल्प अंतर्गत

**समृध्दी कृषी प्रक्रिया सहकारी संस्था मर्या, बार्शिटाकळी**

समृध्दी कृषी प्रक्रिया सहकारी संस्था मर्या. बार्शिटाकळी जि. अकोला संस्थेच्या दैनंदिन प्रशासकीय आर्थिक व व्यावसायिक कामकाजासाठी खालील पदासाठी पात्र उमेदवाराकडून अर्ज मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | पद | शिक्षण | अनुभव | मानधन |
|---|---|---|---|---|
| १ | FPO व्यवस्थापक | ग्रामीण विकास /कृषी/वाणिज्य समाजकार्य संबधित शाखा | FPO/NGO/सहकारी क्षेत्रामध्ये अनुभव ३ वर्ष | ३५०००/- रुपये पर्यंत |
| २ | FPO लेखापाल | बी. कॉम./ लेखापाल व MS-CIT / डिप्लोमा / समान शिक्षण | FPO/NGO/कृषी कंपन्यामध्ये अनुभव ३ वर्ष | कमान २५०००/-रुपये पर्यंत |

**नोकरीचा प्रकार :- प्रकल्प कालावधीकरीता पूर्ण वेळ.**

**इच्छुक उमेदवारांनी** आपला अर्ज शैक्षणिक कागदपत्रे, अनुभव प्रमाणपत्रे बायोडाटा cmrcbarshitakli@gmail.com या मेलवर किंवा समृध्दी कृषी प्रक्रिया सहकारी संस्था मर्या. बार्शीटाकळी व्दारा सभापती बंगला SBI बैंक समोर, पंचायत समिती बाय पास रोड बार्शीटाकळी ता. बार्शीटाकळी जि. अकोला या ठिकाणी दिनांक १५/०५/२०२६ पर्यंत किंवा पत्राव्दारे किंवा इमेलव्दारे सादर करावे.

**अध्यक्ष / सचिव**
**समृध्दी कृषी प्रक्रिया सहकारी संस्था मर्या.**
बार्शीटाकळी ता. बार्शीटाकळी जि. अकोला
मो. नं.: ८८३०२४००७८,
९५११८३२२७४ ७७७५९२८१८४

सिटी न्यूज अकोला

बुधवार, दि. ६ मे २०२६

http://epaper.citynewssuperfast.com

## मनपाच्या हद्दितील दुकान व आस्थापनांनी व्यावसायिक परवाना काढावा : विजय पारतवार

**अकोला :** महानगरपालिका हद्दीतील सर्व प्रतिष्ठानधारक व्यवसायीकांना सुचीत करण्यात येते की, सर्व प्रतिष्ठानाधारकांनी आपण व्यवसाय करीत असलेल्या प्रतिष्ठानाचे मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ चे कलम ३७२ ते ३८६ चे प्रकरण १८ मधील भाग १ ते ४ नुसार महाराष्ट्र शासन निर्णय दि.१०/१०/२००६ अन्वये सर्व लहान मोठे व्यावसायिकांनी महानगरपालिकेचा परवाना काढूनच व्यवसाय करणे अनिवार्य आहे. तरी आपण करीत असलेल्या व्यवसायाचा परवाना काढून व्यवसाय करावे व अकोला महानगरपालिकेला सहकार्य करावे आणि दंडात्मक सारख्या अप्रिय कार्यवाही टाळण्याचे आवाहन मनपा उपायुक्त विजय पारतवार यांनी केले आहे.

## लहान उमरी परिसरात विजेचा लपंडाव

**अकोला :** लहान उमरी भागात विजेचा लपंडाव रोजचा झाला आहे. अकोल्याच्या विक्रमी तापमानात रात्री-बेरात्री कधीही बत्ती गुल होत असल्याने नागरिकांना उकाड्याचा असह्य त्रास सहन करावा लागत आहे. सोमवारी रात्री पाच ते सहा वेळा वीज पुरवठा खंडित झाला होता. मंगळवारीदेखील दिवसभर वीज पुरवठा अनेकदा खंडित झाला होता. आता रात्रीही वीज जात असल्याने नागरिकांमध्ये रोष व्यक्त होत आहे.

# शहरातील मुख्य रस्त्यावरील अतिक्रमण हटवले

प्रतिनिधी ६ मे



♦ मनपा व पोलिस दलाची संयुक्त कारवाई

**अकोला :** शहरातील प्रमुख रस्त्यांवर गेल्या काही दिवसांपासून सायंकाळच्या वेळी वाढत चाललेली वाहतूक कोंडी आणि अतिक्रमणाची समस्या लक्षात घेऊन अकोला महानगरपालिका व अकोला पोलिस दलाने सोमवारी सकाळ व सायंकाळ अशा दोन वेळा संयुक्त अतिक्रमण हटाव कारवाई केली.

ही कारवाई ओपन थिएटरपासून फतेह चौक, गांधी चौक ते ताजनापेठ पोलिस चौकी तसेच सिटी कोतवाली ते खुले नाट्यगृह या प्रमुख मार्गांवर राबविण्यात आली. यावेळी रस्त्यावर लावण्यात आलेले फळ विक्रेते, कपड्यांची दुकाने, हातगाड्या व ठेले यांसारखे अतिक्रमण हटवून रस्ते मोकळे करण्यात आले. मनपा अतिक्रमण विभाग व वाहतूक विभाग तसेच सिटी कोतवाली पोलिसांनी संयुक्तपणे दलबलासह कारवाई करत रस्त्यावर व्यवसाय करणाऱ्या अतिक्रमणधारकांना हॉकर्स झोनमध्ये स्थलांतर करण्याचे कडक निर्देश दिले. ही कारवाई अकोला महानगरपालिकेचे आयुक्त सुनील लहाने यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. यामध्ये अतिक्रमण विभागाचे सहाय्यक अधिकारी प्रवीण मिश्रा, चंद्रशेखर इंगळे, वाहतूक विभागाचे पोलिस निरीक्षक मनोज बोहरील तसेच सिटी कोतवाली पोलिस ठाण्याचे कर्मचारी सहभागी झाले होते. पुढील काळातही शहरातील प्रमुख मार्गांवर सकाळ व सायंकाळ या दोन्ही वेळेस अशा प्रकारच्या कारवाया सातत्याने राबविण्यात येणार असल्याची माहिती अतिक्रमण विभागाकडून देण्यात आली आहे.

# गडंकी, नदीकाठच्या हिंदू स्मशानभूमीचे नुतनीकरण करा

♦ सनातन संस्कृती महासंघाचे स्थायी समिती सभापतींना निवेदन

प्रतिनिधी ६ मे



**अकोला :** जुन्या शहरातील गडंकी तसेच हरिहरपेठ भागातील हिंदू स्मशानभूमीचे नुतनीकरण करावे. तसेच दाबकी रोड भागात नवीन स्मशानभूमी बांधावी अशा आशयाचे निवेदन सनातन संस्कृती महासंघा तर्फे मनपा स्थायी समितीचे सभापती विजय अग्रवाल यांना देण्यात आले. आयुक्तांनाही प्रत दिली आहे. निवेदनात म्हटले आहे की, गडंकी हिंदू स्मशानभूमी पूर्वी पासून दुर्लक्षित आहे. पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यासाठी दोन शेड आहेत, त्यावरील टिन खराब झाले आहेत.अनेक वेळा पार्थिवावर उघड्यावर अंत्यसंस्कार करावे लागतात. याचा उन्हाळ्यात आणि पावसाळ्यात अतिशय त्रास होतो. अंत्यसंस्कारासाठी येणारे नातेवाईक व आप्तेष्टांना बसण्यासाठी दोन निवारे आहेत. दोन्हीची देखभाल करण्यात येत नाही. स्मशानभूमी परिसर अस्वच्छ असतो. तेथील महादेवाचे मंदिर देखील दुर्लक्षित आहे. तसेच, हरिहर पेठ नदी काठावरील हिंदू स्मशानभूमीची परिस्थिती देखील दयनीय आहे. जुन्या शहराचा विस्तार अतिशय वेगाने होतो आहे. दाबकी रोड रेल्वे उड्डाणपूला पर्यंत रहिवासी वस्ती पोचली आहे. त्या भागासाठी देखील हिंदू स्मशानभूमी असणे आवश्यक आहे. महानगरातील मोहता मील, सिंधी कॅम्प व उमरी स्मशानभूमीत पक्के शेड असून, लोकांना बसण्यासाठी बांधलेले निवारे आणि परिसर स्वच्छ आहे. उमरी स्मशानभूमीत एक दाहीनी आहे, ज्यात पार्थिवांना अग्नी देण्यासाठी गोवऱ्यांचा वापर केला जातो. दाबकी रोड भागाचा विस्तार पाहता, त्या भागासाठी हिंदू स्मशानभूमी बांधण्याची व्यवस्था करावी. अशी मागणी सनातन संस्कृती महासंघातर्फे करण्यात आली आहे. स्मशानभूमीच्या नूतनीकरणाचे काम लवकरच सुरू करण्यात येईल, तसेच दाबकी रोड भागासाठी स्मशानभूमी करिता योग्य जागेचा शोध घेऊन कारवाई करण्यात येईल असे आश्वासन विजय अग्रवाल यांनी दिले.निवेदन देताना महासंघाचे हेमंत जकाते, जयंत इंगळे, मनोज अग्रवाल, नरेंद्र कराळे, अमित शिरसाट, राजेंद्र मुळे, मोहित नायसे, ऋषीकेश जकाते आदी उपस्थित होते.

# किड्स पॅराडाईजच्या विद्यार्थ्याने बनवली 'सेल्फ चार्जिंग बाईक'

प्रतिनिधी ६ मे

♦ भारत सरकारच्या इन्स्पायर अवॉर्ड साठी प्रकल्पाची निवड



**पातूर :** भारत सरकारच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान विभाग आणि नॅशनल इनोव्हेशन फाउंडेशनच्या वतीने राबवल्या जाणाऱ्या प्रतिष्ठेच्या 'इन्स्पायर अवॉर्ड्स - मानक' २०२५-२६ साठी पातूरच्या किड्स पॅराडाईज पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्याच्या प्रकल्पाची निवड झाली आहे. इयत्ता दहावीत शिकत असलेल्या प्रणव विशाल कांबळे याने ए आय मॉड्युल विकसित करीत 'सेल्फ चार्जिंग बाईक' हा प्रकल्प तयार केला होता. या प्रकल्पाचे त्याने इन्सापयर साठी नामांकन दखल केले या अभिनव प्रकल्पाची दखल भारत सरकारच्या इन्स्पायर अवॉर्ड मानक समितीने घेतली असून त्याला इन्स्पायर अवॉर्ड साठी नामांकन मिळाले आहे. किड्स पॅराडाईज पब्लिक स्कूलच्या प्रणव कांबळे याला आपला वैज्ञानिक प्रकल्प किंवा 'प्रोटोटाइप' वर्किंग मॉड्युल विकसित करण्यासाठी दहा हजार रुपये अर्थसहाय्य मंजूर झाले आहेत. हा प्रकल्प अधिक विकसित केल्यानंतर पुढील प्रदर्शनीमध्ये मांडला जाणार आहे. त्यासाठी प्रणव अथक परिश्रम घेत आहे.

या यशाबद्दल शाळेचे संस्थापक अध्यक्ष गोपाल गाडगे, कार्यकारी संचालिका सौ. ज्योत्स्ना गाडगे, शाळेचे मुख्याध्यापक चंद्रमणी धाडसे, विज्ञान शिक्षक हरिष सौंदळे यांच्यासह शिक्षकांनी प्रणवचा सत्कार केला.

# विशाल नंदागवळी जिल्हा युवा पुरस्काराने सन्मानित

प्रतिनिधी ६ मे



**अकोला :** सामाजिक जाणीव व कर्तृत्वाच्या बळावर ज्ञानाचा दिवा लावणाऱ्या विशाल लक्ष्मण नंदागवळी याला महाराष्ट्र शासनाचा प्रतिष्ठेचा 'जिल्हा युवा पुरस्कार-२०२५' दि १ मे रोजीच्या महाराष्ट्र दिनाच्या दिमाखदार सोहळ्यात लाल बहादूर शास्त्री स्टेडियम येथे जिल्ह्याचे पालकमंत्री आकाश पुंडकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला याप्रसंगी माजी आमदार अमोल मिटकरी, माजी आमदार वसंत खोटरे, प्रभारी जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम, जिल्हा क्रीडा अधिकारी नंदा खुरपुडे, जिल्हा पोलिस अधीक्षक अर्चित चांडक तसेच मनपा आयुक्त लहाने या मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. विशाल चे आईवडील विचार पिठावर त्याच्या सोबत होते हे विशेष.

पदवी शिक्षण घेतानाच विशालने उप-जिल्हाधिकारी प्रा. संजय खडसे यांच्या सहाय्याने परिसरातील इतर झोपडपट्टीतील मुलांना निःशुल्क शिकवण्यास सुरुवात केली. त्याच्या प्रेरणेने आज परिसरातील ४०हून अधिक मुले शाळेत जाऊ लागली आहेत. वक्तृत्वाची गोडी त्याला महाविद्यालयीन जीवनात लागली आणी त्याने अकोला ते दिल्ली असा प्रवास वक्तृत्वाच्या भरवशावर केला. विविध स्थानिक, जिल्हा, राज्य, व राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धांमध्ये यशस्वी कामगिरी करुन ढिगाने बक्षिसे मिळवली. आणी सार्थक वक्तृत्व अकॅडमी व शैक्षणिक, सामाजीक कार्य करण्यासाठी सार्थक युवा प्रतिष्ठान ची स्थापना केली. हा पुरस्कार प्राप्त झाल्यानंतर विशालच्या झोपडपट्टीत जणू सणाचे वातावरण आहे. शेजारी-पाजारी, मित्र आणि आई-वडीलाच्या डोळ्यात अभिमानाश्रू आहेत. विशालचे आता स्वप्न आहे या परिसरातील प्रत्येक मूल जातीय, धार्मिक व आर्थिक भेद न पाळता शिकून मोठं व्हावे.' जिल्हा युवा पुरस्कार ही सुरुवात आहे. अंतिम लक्ष्य इतर झोपडपट्ट्यांमध्येही शिक्षणाची ज्योत पोहोचवणे आहे.अशी प्रतिक्रिया त्याने दिली.

# अडगावंचे गुटखा किंग आजूबाजूच्या खेड्यापाड्यात करतात गुटखा सप्लाय

प्रतिनिधी ६ मे

**हिवरखेड :** पोलिस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या अडगाव बु मधील गुटखा माफिये पुन्हा सक्रिय झाले असल्याचे दिसून येत आहे, हे गुटखा माफिये अडगाव वरून सिरसोली, पाथर्डी, मुडगाव, तळेगाव, दानापूर, एदलापूर, पिंपरी, यासारख्या बऱ्याच खेड्या पाड्या मध्ये हे गुटखा विक्री करतात, यांची माही पोलिसांना असून पोलिस यांना घाबरत तर नाही ना असा सवाल? सामान्य जनता करीत आहे, असे बोलण्याचे कारण सामान्य जनते जवळ आहे त्यामुळे सामान्य जनता सत्य बेधडक बोलतात, अडगाव मध्ये मोठ्या प्रमाणात काही दिवसापूर्वी आगीचा तांडव झाला होता, यामध्ये ही आग अवैध डिझलने लागली होती, हे सर्विकडे स्पष्ट झाले होते, या प्रकरणात सुध्दा याच गुटखा माफियाचा हात होता, काही फरार होण्यास यशस्वी झाले होते, तर काही पोलिसांनी जेरबंद केले होते, एवढे सर्व झाल्यावरही या माफियांची दादागिरी कमी नाही झाली, याच्या पैकी एक तस्कर काही दिवसांपूर्वी खुले आम तळेगांव बाजार मध्ये रेशन तांदूळाचा काळाबाजार करीत होता, तेथील नागरिकांनी त्याला पळून लावले, आज हे माफिये पुन्हा सक्रिय होऊन गुटखा विक्री जोमात करीत आहेत, ज्यामुळे शाळकरी विद्यार्थ्यांचे आरोग्य धोक्यात येत आहे, यांचीच एक टोळी हिवरखेड मध्ये सक्रिय असून या टोळीचे तर चक्क सिसिटीव्ही फोटो व्हिडिओ नागरिकांन जवळ सहज उपलब्ध आहेत, एवढा मोठा प्रकार पोलिसांना माहिती असून स्थानिक पोलिस वरिष्ठांना दाखवण्यासाठी चिल्लर विक्रेते कारवाई करून मोठ्या माशांना मोकाट सोडते यामुळे गावात याबाबत आगळी वेगळी उलट सुलट चर्चा नागरिक करीत आहेत.

# विद्युत तारेच्या घर्षणामुळे शेतकऱ्याची झोपडी जळून खाक

वि प्रतिनिधी ६ मे



**अकोट :** उमराआलमपूर शेत शिवारात विद्युत तारेच्या घर्षणामुळे लागलेल्या भीषण आगीत शेतकरी आनंद बागाणी यांची शेतातील झोपडी जळून खाक झाल्याची घटना घडली. या आगीत सुमारे दोन लाख रुपयांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, शेताजवळून जाणाऱ्या सैल व जुने झालेले विद्युत तारे एकमेकांवर आदळल्याने ठिणग्या उडाल्या. या ठिणग्यांमुळे शेतातील खोपलीला आग लागली. काही क्षणांतच आगीने भीषण रूप धारण करत झोपडीतील सर्व साहित्य भस्मसात केले. या आगीत पिकांच्या संरक्षणासाठी वापरण्यात येणारे स्प्रिंकलर संच, ड्रिपच्या बंडल्ससह शेतीचे विविध साहित्य जळून गेले. तसेच पाच संत्रा झाडे, एक जांभूळाचे झाड, एक सिताफळाचे झाड आणि दोन आंब्याची झाडेही आगीत नष्ट झाली. घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत आग विझवण्याचा प्रयत्न केला. मात्र आग मोठ्या प्रमाणात पसरल्याने संपूर्ण नुकसान टाळणे शक्य झाले नाही. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. दरम्यान, परिसरातील शेतकऱ्यांनी विद्युत विभागाच्या निष्काळजीपणावर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. जुने व सैल झालेले विद्युत तारे त्वरित दुरुस्त करावेत, तसेच अशा घटना टाळण्यासाठी योग्य उपाययोजना कराव्यात, अशी मागणी करण्यात येत आहे. याशिवाय, प्रशासनाने नुकसानग्रस्त शेतकऱ्याला तातडीने आर्थिक मदत द्यावी, अशी मागणीही नागरिकांकडून होत आहे.

# जीएमसीच्या आयसीयू मध्ये ॲडमिट बेपत्ता अनोळखी रुग्णाची ओळख पटविण्याचे आवाहन

प्रतिनिधी ६ मे



**अकोला :** २७/०४/२०२६ पासून शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालय, अकोला येथील क्षयरोग व छातीरोग विभाग अंतर्गत वार्ड क्रमांक १५ (आय.सी.यु) मध्ये एक अनोळखी पुरुष रुग्ण देवराव किसन कात्रे वय ५५ वर्ष रुग्णालय नोंदणी क्रमांक ३४४७५४ असून राहणार व्याळा, तालुका बाळापूर, जिल्हा अकोला असा पत्ता सांगत आहे गंभीर परिस्थितीमध्ये रुग्णाला एका व्यापाऱ्याने अपघात विभागामध्ये उपचाराकरिता भरती केले. परंतु अजूनतरी कोणीही नातेवाईक किंवा ओळखीचे कोणी रुग्णाची ओळख पटविण्यासाठी पुढे आलेले नाहीत. सदर रुग्णाची कोणालाही ओळख पटल्यास किंवा नातेवाईक असल्यास त्यांनी रुग्णालयाचे समाजसेवा अधीक्षक लक्ष्मीकांत शिंगोटे (८३८०८३०१८२) यांच्याशी संपर्क करावा. माननीय अधिष्ठाता डॉ.संजय सोनुने सर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि वैद्यकीय अधीक्षक डॉ.श्यामकुमार सिरसाम सर यांच्या देखरेखीमध्ये क्षयरोग व छाती रोग विभागाचे विभाग प्रमुख डॉ.सदानंद भिसे सर, डॉ.पियुष गुप्ता सर, डॉ.मोहम्मद जाहिद, डॉ.राहुल वाघमारे, डॉ. ऋषभ पाडोल, डॉ.खुशबू दुबे, डॉ.शिवकिरण हे रुग्णावर उपचार करीत आहेत. वार्ड परिसेविका अनिता बागडे परिचारिका वैशाली चव्हाण, चेतना तितरमारे, अश्विनी काटेकर, शुभम गायकवाड कक्षसेवक अमोल मुळे व सफाईकामगार सुरज हे रुग्णाची परिचर्या, देखभाल व काळजी घेत आहेत. सदर अनोळखी रुग्णाचे नातेवाईक शोधल्यावर किंवा पुढे आल्यावर रुग्णाचे डिस्चार्ज दरम्यानचे मेडिकल सोशल वर्कची कामे, पुनर्वसन, मदत व समन्वय करण्याचे कामकाज समाजसेवा अधीक्षक लक्ष्मीकांत शिंगोटे करतील तसेच त्यांना मेडिकल सोशल वर्कर अमित मिटकरी, तन्मय बांगर हे मदत करीत आहेत.

# जाजू नगरात सावित्रीबाई फुले महिला मंडळाच्या वतीने भिक्खू संघाच्या धम्म रॅलीचे स्वागत

प्रतिनिधी ६ मे



**अकोला :** जाजू नगरात सावित्रीबाई फुले महिला मंडळाच्या वतीने भिक्खू संघाच्या धम्म रॅलीचे स्वागत व भोजनदानाच्या कार्यक्रम उत्साहात झाला. कार्यक्रमाची सुरुवात वंदनेने करण्यात आली.

संस्था अध्यक्ष रंजना शिरसाट, उपाध्यक्ष रूपालीताई वानखडे, सचिव विजय भोजने, कोषाध्यक्ष अंजूताई तेलगोटे, सहसचिव शितलताई जंजाळ व सदस्य लक्ष्मीताई गजभार, हिवराळेताई, ज्योतीताई भोजने, दीक्षाताई भोजने, वंदना शिरसाट, साधनाबाई शेगोकार, जयाताई वानखडे, काजल ताई खंडारे, मनीषा खंडारे, सुजाता खंडारे, पळसपगारताई, शीला गवळी, पूजा जंजाळ, नीताताई या महिलांनी फुले वाहून स्वागत केले.

प्रमोद वानखडे, सनी हिवराळे, गौरव शिरसाट, मनीष तेलगोटे, आर्यन गवई, तेजस शिरसाट, उमज डोंगरे, अक्षय हिवराळे, प्रेम वानखडे, पदमन भोजने, प्रसंजित बांगर यांनी कार्यक्रमात महत्वपूर्ण योगदान दिले. तसेच भोजने काका, रमेश गजभार, खंडारे मामा, हिवराळे, रवींद्र शिरसाट यांनी कार्यक्रमात सहभाग नोंदवला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अंकुश भाऊ शिरसाट यांनी केले.

# शिवनीच्या सैयद मोहसीन उर्दू हायस्कूल मध्ये महाराष्ट्र दिन साजरा




प्रतिनिधी ६ मे

**अकोला :** यंग मुस्लिम एज्युकेशन अँड सोशल वेलफेअर सोसायटी पातुर व्दारा संचालित सैयद मोहसीन उर्दू हायस्कुल शिवनी येथे महाराष्ट्र दिन उत्साहत साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात झेंडावंदन करुन करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष शाळेचे मुख्याध्यापक सैयद मोहीब ईकबाल होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक सहायक शिक्षक असीमोद्दीन यांनी केले. महाराष्ट्र दिनाचे महत्व विद्यार्थ्यांना सांगितले. अध्यक्षांच्या हस्ते वार्षिक निकाल जाहीर करण्यात आले. स्पर्धा परीक्षेत प्रविण्य प्राप्त विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्र संचालन मो. अनवारोद्दीन यांनी तर, आभार प्रदर्शन मो. जाहीद यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शमशेर खान खान अजमतुल्ला, काजी मोईन मोहम्मद फारूक सैयद वसीम यांनी परिश्रम घेतले.

समर्थ शिक्षण प्रसारक मंडळ व्दारा संचालित एफ ५२२६

मॉं. गायत्री प्राथमिक शाळा व
स्व. प्रकाश देशमुख माध्यमिक विद्यालय
गायत्री नगर, अकोला

आम्ही गुणवत्ता पाहून प्रवेश देत नाही तर,
प्रवेश घेणाऱ्या प्रत्येकामध्ये गुणवत्ता निर्माण करतो!

वैशिष्ट्ये :
1)अनुभवी शिक्षकवृंद
2)सुसज्ज पायाभूत ईमारत
3)दर्जेदार अभ्यासक्रमासोबत नाविण्यपूर्ण उपक्रम
4)सर्व पुस्तकांनी युक्त वाचनालय
5)आनंददायी शिक्षण पध्दती
6)CCTV ची सुविधा
7)कला, संस्कृती, क्रिडा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीन विकासावर भर
8)सुसज्ज प्रयोगशाळा

इयत्ता 1 ली ते 10 वी साठी प्रवेश देणे सुरु आहे.
1)इयत्ता 1 ली ते 8 वी च्या विद्यार्थ्यांना मोफत गणवेश
2)इयत्ता 1 ली ते 10 वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना मोफत बससेवा उपलब्ध
3)शालेय पोषण आहार



माँ गायत्री प्राथमिक शाळा व स्व. प्रकाश देशमुख विद्यालय
मो. 9921186715, 9511254959, 9421895790, 9960437366

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ

बुधवार, दि. ६ मे २०२६ https://epaper.citynewssuperfast.com

# वरोडी–आनंदवाडी पुलाच्या कामात अनियमितता

## बांधकाम विभागावर डोळेझाकीचा ठपका

प्रतिनिधी ६ मे

**महागाव :** वरोडी ते आनंदवाडी दरम्यान सुरू असलेल्या पुलाच्या बांधकामावर गंभीर अनियमिततेचे आरोप होत असून, कामाच्या दर्जाबाबत स्थानिक शेतकरी व प्रवाशांत तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. संबंधित बांधकाम विभागाकडून या प्रकाराकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोपही नागरिकांकडून करण्यात येत आहे.

प्रत्यक्ष पाहणीदरम्यान पुलाच्या बांधकामात आवश्यक त्या प्रमाणात क्युरिंग (पाण्याची निगा) केली जात नसल्याचे आढळून आले.

तसेच मंजूर अंदाजपत्रकानुसार लागणारे सिमेंट व लोखंडी गज अपेक्षित प्रमाणात वापरले जात नसल्याची तक्रार आहे. काही ठिकाणी दर्जेदार रेतीऐवजी मातीमिश्रित रेतीचा वापर होत असल्याने पुलाच्या गुणवत्तेबाबत शंका उपस्थित केली जात आहे.

> ■ याशिवाय, पुलाचे काम पूर्ण होण्यापूर्वीच रस्त्याचे काम पूर्ण करण्यात आल्याने कामाच्या नियोजनावरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. "लाखो रुपये खर्चून उभारला जाणारा पूल निकृष्ट दर्जाचा ठरत असेल, तर संबंधित अभियंते व अधिकाऱ्यांना हे दिसत नाही का?" असा सवाल स्थानिकांकडून उपस्थित केला जात आहे.



दरम्यान, परिसरातील शेतकरी व प्रवाशांनी या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. बांधकाम विभागाच्या भूमिकेबाबत नागरिकांत तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

# टिपेश्वर परिसरात आगीचे तांडव; वन्यजीवांचे अस्तित्व धोक्यात

प्रतिनिधी ६ मे

**पांढरकवडा :** केळापूर तालुक्यातील टिपेश्वर अभयारण्या लगतच्या शेतशिवारात सध्या आगीच्या घटनांनी गंभीर स्वरूप धारण केले आहे. शेतातील कचरा व धुरे जाळण्याच्या प्रकारामुळे अनेक ठिकाणी वणवे पेट घेत असून, याचा थेट परिणाम वनसंपदा आणि वन्यजीवांवर होत आहे. मात्र, या प्रकाराकडे वनविभाग दुर्लक्ष करत असल्याचा आरोप स्थानिकांकडून केला जात आहे.



अर्ली, चनाखा, कोदोरी, बोथ, पहापळ व बोरी या गावांचा परिसर अभयारण्यालगत असल्याने येथे आगीचा धोका अधिक वाढला आहे. विशेषतः सुन्ना परिसरात शेतातील कचरा जाळण्याचे प्रमाण वाढले असून, अनेकदा ही आग जंगलात पसरत आहे.

वाघांसह विविध वन्यजीवांसाठी ओळखल्या जाणाऱ्या या अभयारण्यात आगीमुळे भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. पक्ष्यांची घरटी नष्ट होत असून, लहान प्राणी होरपळून मरत आहेत, तर मोठ्या प्राण्यांना अधिवास सोडून भटकंती करावी लागत आहे.

दरम्यान, वारंवार आगीच्या घटना घडूनही वनविभागाकडून तातडीने उपाययोजना केल्या जात नसल्याची तक्रार नागरिकांनी व्यक्त केली आहे. दोषींवर कारवाई करून वणवे रोखण्यासाठी ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

## चाइल्ड हेल्पलाइनकडे तक्रार; दोन बालविवाह रोखले

प्रतिनिधी ६ मे

**यवतमाळ :** यवतमाळ तालुक्यातील भोयर गावात एकाच दिवशी होणारे दोन बालविवाह प्रशासनाने वेळीच हस्तक्षेप करून रोखले. चाइल्ड हेल्पलाइन १०९८ कडे मिळालेल्या गोपनीय माहितीनंतर बाल संरक्षण कक्षाने तातडीने कारवाई करत दोन्ही विवाह थांबवले. भोयर येथील दोन १७ वर्षीय मुलींचे विवाह ठरल्याची माहिती मिळाल्यानंतर अंगणवाडी सेविकांमार्फत त्यांच्या वयाची पडताळणी करण्यात आली. अधिकृत नोंदींनुसार दोन्ही मुली अल्पवयीन असल्याचे स्पष्ट झाल्याने हा प्रकार बालविवाह ठरत होता. त्यानंतर २३ एप्रिल रोजी प्रशासकीय पथकाने संबंधित कुटुंबांची भेट घेऊन समुपदेशन केले.




**यवतमाळ :** तापलेल्या धरतीला दिलासा देणारी सूर्यास्ताची सोनेरी छटा घाटंजी तालुक्यातील जरंग गावाजवळ अनुभवायला मिळाली. दिवसाभराच्या उष्णतेनंतर आकाशात पसरलेली ही मंद, शांत करणारी रंगछटा परिसराला नवसंजीवनी देत होती. क्षितिजावर मावळणारा सूर्य, आकाशातील केशरी आणि सोनसळी रंगांची उधळण, आणि निसर्गाची प्रसन्न शांतता मनाला सुखावणारी होती. हा देखणा क्षण छायाचित्रकार साहेबराव पवार यांनी आपल्या कॅमेऱ्यात सुंदरपणे टिपला आहे. त्यांच्या या छायाचित्रातून ग्रामीण भागातील निसर्गसौंदर्य आणि संध्याकाळची मोहकता जिवंतपणे समोर येते, जी प्रत्येकाला क्षणभर थांबून निसर्गाचा आनंद घेण्यास भाग पाडते.

# खुन प्रकरणात आरोपीला ७ वर्षांची शिक्षा

प्रतिनिधी ६ मे

**यवतमाळ :** जिल्ह्यातील कळंब तालुक्यात घडलेल्या खुनाच्या प्रकरणात न्यायालयाने महत्त्वपूर्ण निर्णय देत आरोपीस ७ वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश एस. सी. मुनघाटे यांनी हा निकाल मंगळवारी (दि. ५ मे) जाहीर केला.

विजय रामभाऊ खुडसंगे (वय ५९, रा. खुदानपुर, ता. कळंब) याच्यावर भारतीय दंड संहितेच्या कलम ३०२ व ३२४ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. १० नोव्हेंबर २०२३ रोजी सकाळी सुमारास ११ वाजता आरोपीने



राजेश नानाजी कोल्हे यांना चहासाठी घरी बोलावून चाकूने हल्ला केला. या घटनेत मध्यस्थी करण्यासाठी आलेल्या अनिकेत कोल्हे यांच्याही हाताला दुखापत झाली होती. गंभीर जखमी झालेल्या राजेश कोल्हे यांना ग्रामीण रुग्णालयात नेण्यात आले असता डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. या प्रकरणात पोलिसांनी तपास पूर्ण करून न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले होते. खटल्यादरम्यान एकूण पाच साक्षीदारांची साक्ष नोंदविण्यात आली. साक्षीपुरावे, वैद्यकीय अहवाल आणि अन्य दस्तऐवजांच्या आधारे न्यायालयाने आरोपीचा हेतुपुरस्सर खून करण्याचा उद्देश नसल्याचे नमूद केले. त्यामुळे कलम ३०२ ऐवजी ३०४ (भाग २) अंतर्गत दोषी ठरवत ७ वर्षे सश्रम कारावास, ५०० रुपयांचा दंड व दंड न भरल्यास तीन महिन्यांच्या अतिरिक्त कारावासाची शिक्षा सुनावण्यात आली.

सरकारी पक्षातर्फे सहायक सरकारी वकील मंगेश एस. गंगलवार यांनी बाजू मांडली. या प्रकरणाचा तपास पोलीस उपनिरीक्षक सागर भारसकर यांनी केला होता. तसेच पैरवी अधिकारी हेड कॉन्स्टेबल विजय कुडमेथे यांनीही सहाय्य केले.

# हरदडा–पुसद रस्त्याचे काम पूर्ण करा; अन्यथा १२ मे रोजी रास्ता रोको

प्रतिनिधी ६ मे

**उमरखेड :** हरदडा ते पुसद या महत्त्वाच्या मार्गाचे काम तातडीने पूर्ण करावे, अन्यथा १२ मे रोजी हरदडा फाटा येथे रास्ता रोको आंदोलन करण्यात येईल, असा इशारा परिसरातील सर्वपक्षीय कार्यकर्त्यांनी दिला आहे. यासंदर्भात उपविभागीय अधिकारी सखाराम मुळे यांना निवेदन देण्यात आले.

केंद्र शासनाच्या हायब्रिड ॲन्युइटी मॉडेल (HAM) योजनेअंतर्गत एमएसआयडीसी विभागामार्फत या रस्त्याचे काम सुरू आहे. मात्र ठेकेदाराच्या नियोजनशून्य कारभारामुळे



संपूर्ण रस्ता खोदून ठेवण्यात आला असून, सध्या रस्त्याची अवस्था अत्यंत बिकट झाली आहे. मोठमोठे खड्डे, उडणारी धूळ आणि अवजड वाहनांची वर्दळ यामुळे हा मार्ग अक्षरशः अपघातांना निमंत्रण देत असल्याचे चित्र आहे.

हा मार्ग उमरखेड तालुक्याला जोडणारा प्रमुख दळणवळणाचा मार्ग असल्याने दररोज मोठ्या प्रमाणात वाहतूक होते. खराब रस्त्यामुळे लहान-मोठे अपघात सातत्याने घडत असून वाहनधारकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. धुळीच्या लोटांमुळे नागरिकांच्या आरोग्यावरही विपरीत परिणाम होत आहे.

दरम्यान, या मार्गावर असलेल्या अमृतेश्वर महादेव मंदिरात दररोज शेकडो भाविक दर्शनासाठी येत असतात. मात्र रस्त्याच्या दुरवस्थेमुळे विशेषतः वयोवृद्ध नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

या संदर्भात वारंवार तोंडी तक्रारी करूनही संबंधित विभागाकडून दुर्लक्ष होत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. पुढील तीन दिवसांत काम युद्धपातळीवर सुरू करून पावसाळ्यापूर्वी पूर्ण करावे, अशी मागणी करण्यात आली आहे. खराब रस्त्यामुळे अपघाती मृत्यू झाल्यास संबंधित विभागावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा, अशी मागणीही निवेदनात करण्यात आली आहे.

या निवेदनावर काँग्रेसचे बाळासाहेब चंद्रे पाटील, शिंदे शिवसेनेचे दत्तदिगंबर वानखेडे, मनसेचे तालुकाध्यक्ष सादिक शेख, माजी जिल्हा परिषद सदस्य व तंटामुक्ती अध्यक्ष रामराव गायकवाड, आझाद समाज पार्टीचे जॉन्टी, शिवसेनेचे शहर प्रमुख संजय सल्लेवाड, विणकरे, (उबाठा) गटाच्या कांता वासमवार, संभा गोरटकर, प्रशांत जोशी, शेख बशीर, अमोल तुपेकर, संतोष मंतेवाड, समृद्धी गायकवाड, बंटी वाळके आदींच्या स्वाक्षऱ्या असून अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

# कंत्राटी कर्मचा-यांचा ठिय्या; पगारासाठी थेट पोलीस ठाण्यात धडक

## कंत्राटदारावर फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्याची मागणी

प्रतिनिधी ६ मे

**पांढरकवडा :** नगर परिषद पांढरकवडा अंतर्गत काम करणाऱ्या कंत्राटी कर्मचाऱ्यांचे मार्च २०२६ चे वेतन अद्याप न मिळाल्याने संतप्त कर्मचाऱ्यांनी आज थेट पोलीस ठाण्याचा दरवाजा ठोठावला. नागपूर येथील 'ओम साई असोसिएट' या कंत्राटदाराने नगर परिषदेकडून रक्कम मिळूनही कर्मचाऱ्यांचे वेतन थकवल्याचा आरोप करत त्याच्यावर फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्याची मागणी करण्यात आली आहे.

नगर परिषद प्रशासनाने मार्च महिन्याच्या वेतनासाठी संबंधित कंत्राटदाराला रक्कम अदा केल्याची माहिती समोर आली आहे. मात्र, कर्मचाऱ्यांना अद्याप वेतन मिळालेले नाही. तसेच ईपीएफची (EPF) कपात



करूनही ती रक्कम जमा न केल्याचा आरोपही कर्मचाऱ्यांनी केला आहे.

या प्रकरणी नगर परिषदेकडून वारंवार पत्रव्यवहार आणि सूचना देण्यात आल्या असतानाही कंत्राटदाराने कोणताही प्रतिसाद दिला नसल्याचे कर्मचाऱ्यांचे म्हणणे आहे. दरम्यान, मोबाईलवर संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता संबंधित कंत्राटदाराने अरेरावीची भाषा वापरून शिवीगाळ केल्याचाही आरोप करण्यात आला आहे. वेतन थांबल्याने अनेक कर्मचाऱ्यांवर आर्थिक संकट ओढावले असून उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला आहे. करारानुसार दरमहा वेतन देणे बंधनकारक असतानाही कंत्राटदार जाणीवपूर्वक टाळाटाळ करत असल्याचा आरोप करत कर्मचाऱ्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. "नगर परिषदेने पैसे देऊनही आमचा पगार थांबवला जात आहे, ही आर्थिक फसवणूक आहे. त्यामुळे कंत्राटदारावर तातडीने गुन्हा दाखल करून थकीत वेतन मिळवून द्यावे," अशी मागणी साक्षी विलास भोयर, शिल्पा राजू दिकोंडावार, शुभम भडांगे, सचिन कोडापे, सी. रत्नाकर यांच्यासह कर्मचाऱ्यांनी पोलीस निरीक्षकांकडे केली आहे. या प्रकरणावर पोलीस आणि नगर परिषद प्रशासन काय भूमिका घेते, याकडे कर्मचाऱ्यांचे तसेच शहरवासीयांचे लक्ष लागले आहे.

# विवाहसोहळ्याचे सामाजिक भान; वृद्धाश्रमात बेडशीट वाटप

## नवदाम्पत्य पायल-समीरचा उपक्रम

प्रतिनिधी ६ मे

**आर्णी :** विवाहसोहळा केवळ उत्सव न राहता सामाजिक बांधिलकी जपणारा ठरू शकतो, याचे उदाहरण आर्णी येथे पाहायला मिळाले. सामाजिक कार्यकर्ते तथा माजी मंत्री शिवाजीराव मोघे यांचे स्वीय सहाय्यक संजय राऊत यांच्या मुलीचा विवाह आर्णी येथील माहेर मंगल कार्यालयात साधेपणाने व उत्साहात पार पडला.

या सोहळ्याचे औचित्य साधत नवदाम्पत्य पायल व समीर यांनी स्व. सुशीलाबाई नागपुरे वृद्धाश्रमाच्या गरजा लक्षात घेऊन ५५ बेडशीटचे वाटप केले. त्यांच्या या उपक्रमामुळे सामाजिक जाणिवेचा आदर्श निर्माण



झाला असून परिसरात त्याचे कौतुक होत आहे.

यावेळी वृद्धाश्रमाचे संचालक खुशाल नागपुरे, नगरसेविका निताताई ठाकरे, अश्विनीताई राऊत, किरणताई राऊत, अशोक राऊत, संजय राऊत, गुंजनताई राऊत, गजानन काळे, संतोष हरसूलकर आदी उपस्थित होते.

# सेल्फ–अवेअरनेस आणि बॅकअप प्लॅन!

## आयएफएस भुवनेश्वर यांनी दिला स्पर्धा परीक्षार्थींना यशाचा नवा मंत्र

प्रतिनिधी ६ मे

**यवतमाळ :** केवळ पुस्तकी ज्ञानावर अवलंबून राहू नका, अनुभव घ्या आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करा, असा व्यावहारिक सल्ला देत भारतीय वन सेवेतील अधिकारी एन. भुवनेश्वर यांनी 'युवा संवाद' कार्यक्रमात स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना यशाचा नवा मार्ग दाखवला.

जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवन येथे ४ मे रोजी आयोजित या कार्यक्रमात यूपीएससी परीक्षेत देशात ३१ व्या क्रमांकाने यश मिळवणारे आयएफएस अधिकारी एन. भुवनेश्वर यांनी आपला वैयक्तिक अनुभव आणि रणनीती विद्यार्थ्यांसमोर मांडली. जिल्हाधिकारी विकास मीना यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला.



**भुवनेश्वर यांचे महत्त्वाचे सल्ले : स्वतःला ओळखा :** पूर्व परीक्षेत चांगले गुण मिळत असूनही त्यांनी आयएएसऐवजी आयएफएस सेवा निवडली. हा निर्णय 'सेल्फ-अवेअरनेस' आणि ध्येयातील स्पष्टतेचा परिणाम होता.

आधुनिक माध्यमांचा वापर: फक्त पुस्तकांवर अवलंबून राहू नका. YouTube आणि AI टूल्सचा प्रभावी वापर करा, विशेषतः उत्तरपत्रिका तपासणी आणि मार्गदर्शनासाठी.

प्रत्यक्ष अनुभव घ्या: भूगोल व इतिहास शिकताना अजिंठा-वेरूळसारख्या ठिकाणांना भेट द्या. वर्धा किंवा पैनगंगा नदी प्रत्यक्ष पाहून तिचा उगम, प्रवाह समजून घ्या.

**बॅकअप प्लॅन ठेवा :** यूपीएससी अनिश्चित असल्याने करिअरचा बॅकअप प्लॅन तयार ठेवावा, ज्यामुळे मानसिक तणाव कमी होईल. "स्पर्धा परीक्षेची तयारी ही केवळ वाचनाची प्रक्रिया नसून ती समज, अनुभव आणि योग्य निर्णय घेण्याची कला आहे," असा मोलाचा संदेश एन. भुवनेश्वर यांनी उपस्थित युवकांना दिला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला जिल्हाधिकारी विकास मीना यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला आणि स्पर्धा परीक्षेचा प्रवास संयम व चिकाटीचा असल्याचे सांगितले. या संवाद सत्रामुळे विद्यार्थ्यांना पारंपरिक अभ्यास पद्धतींसोबत आधुनिक आणि व्यावहारिक दृष्टिकोन मिळाला असल्याचे दिसून आले.

# भरदिवसा रोकड हिसकावली; दोन इसम फरार

प्रतिनिधी ६ मे

**आर्णी :** शहरात भरदिवसा घडलेल्या धाडसी प्रकारात दोन अज्ञात इसमांनी एका ज्येष्ठ नागरिकाकडील तब्बल दीड लाख रुपयांची रोकड हिसकावून नेल्याची घटना मंगळवारी (५ मे) उघडकीस आली. या घटनेमुळे शहरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, नामदेव गोविंदराव शिंदे (वय ६२, रा. सायखेडा, ता. आर्णी) यांनी बँकेतून १ लाख ५० हजार रुपये काढले होते. ते नवाबासी लेआउट परिसरातील वी. व्ही. मर्या सोसायटीमध्ये रक्कम भरण्यासाठी दुचाकीवरून जात असताना ही घटना घडली.

दरम्यान, शिंदे हे रस्त्यात थांबले असता, दुचाकीवरून आलेल्या दोन अज्ञात इसमांनी त्यांच्या जवळील पैशांची बॅग हिसकावून घेतली आणि क्षणार्धात पसार झाले. शिंदे व त्यांच्या मुलाने आरोपींचा पाठलाग करण्याचा प्रयत्न केला; मात्र आरोपी वेगाने निसटण्यात यशस्वी झाले.

या प्रकरणी आर्णी पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ३०४(२), ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपींचा शोध सुरू आहे.

दरम्यान, दिवसाढवळ्या घडलेल्या या घटनेमुळे नागरिकांमध्ये दहशतीचे वातावरण पसरले असून शहरात पोलिस गस्त वाढवण्याची मागणी जोर धरत आहे.

**जिल्हा न्यायाधीश-१, पुसद यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. क. ६३/२०२५ रामेश्वर - वि- कोणीही नाही ने.ता. १७/०६/२०२६

**जाहीर नोटीस**

UNDER ORDER 5 RULE 20 OF CODE OF CIVIL PROCEDURE

**अर्जदार :-** १. आदीत्य रामेश्वर ब्रिदाळे वय १० वर्ष तर्फे अपाक वडील नामे रामेश्वर देवराव बिद्राळे वय ४७ वर्ष. राहणार खरुस बु. पो.अकोली ता.उमरखेड जि. यवतमाळ.

-विरूध्द -

**गैरअर्जदार :- कोणीही नाही.**

सर्व जनतेस या जाहीर नोटीसद्वारे जाहीर करण्यात येते की, वरील आदीत्य रामेश्वर ब्रिदाळे वय १० वर्ष तर्फे अपाक वडील नामे रामेश्वर देवराव बिद्राळे वय ४७ वर्ष, राहणार खरुस बु. पो. अकोली ता.उमरखेड जि. यवतमाळ अर्जदार आदीत्य रामेश्वर ब्रिदाळे यांच्या नावे एकुन १हे. ८५ आर जमीन असुन त्याचा सातबारा व फेरफार त्याच्या नावे आहे.

मौजा खरुस खु पो. अकोली ता उमरखेड जि. यवतमाळ येथील शेत स.न.२० क्षेत्रफळ १ हे.७६ आर व पो.ख. ० हे.०९ आर. अशी एकुन १ हे. ८५ आर. आहे.

उपरोक्त शेत जमीनीच्या चतुसिमा : पुर्वेस - गणेशराव गाडेकर यांची शेतजमीन, पश्चिमेस - या शेतजमीची उर्वरित शेतजमीन. उत्तरेस - तानाजी ब्रिदाळे यांचे शेत व दक्षिणेस - लक्ष्मीबाई गाडेकर यांचे शेत. तरी सदर शेत जमीन ही अज्ञानाचे हिता करीता त्यांना उच्च शिक्षण देणे करीता तसेच ईतर व्यक्तींकडुन घेतलेल्या कर्जाची परत फेड करणे व सदर शेतीचे उत्पन्नावर गरजा भागविणे शक्य होत नसल्यामुळे सदर शेत जमीन विकी करायची आहे. त्यासाठी वि.न्यायालयाची परवानगी मिळणे आवश्यक आहे, करीता अर्जदाराने मायनॉरिटी ॲण्ड गार्डीयनशिप ॲक्टचे १९५६ चे कलम ८ चे तरतुदी प्रमाणे मालमत्ता विकी करण्याची परवानगी मिळण्या बाबत अर्ज दाखल केला आहे. सबब या नोटीसव्दारे आम जनतेस कळविण्यात येते की, सदर अर्जावर आपला आक्षेप हरकत असल्यास अथवा आपले म्हणने सादर करावयाचे असल्यास आपण स्वतः किंवा संबध अथवा आक्षेप असल्यास लेखी स्वरूपात या न्यायालयात दिनांक १७/०६/२०२६ पूर्वी स्वतः अगर वकीलामार्फत सादर करावा. अन्यथा त्यानंतर आपले कोणत्याही प्रकारचे आक्षेप नाहीत असे गृहीत धरून सदर अर्ज नियमाप्रमाणे निकालात काढण्यात येईल याची नोंद घ्यावी. करीता जाहिर नोटीस देण्यात येत आहे. करिता जाहीर नोटीस देण्यात येत आहे. आज दिनांक ०४/०५/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

-आदेशानुसार-
अधिक्षक,
जिल्हा न्यायालय-१, पुसद

सिटी न्यूज अमरावती

बुधवार, दि. ६ मे २०२६

http://epaper.citynewssuperfast.com

# वलगाव पोलीस स्टेशन हद्दीतील बनावट साबण व निरमा बनविण्याचा कारखाना केला उद्ध्वस्त

प्रतिनिधी ६ एप्रिल

**अमरावती :** वलगाव पोलीस स्टेशन हददीतील बनावट साबण व निरमा बनविण्याचा कारखाना केला उध्वस् केला आहे. अमरावती शहर गुन्हे शाखेची कारवाई, ७१,२०,२५०/- लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

पोलीस आयुक्त अमरावती शहर यांचे आदेशाने शहरातील सर्वप्रकारच्या अवैध धदयांवर कारवाई करणे सतत सुरु असून आज दिनांक ०५/०५/२०२६ रोजी गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संदिप चव्हाण यांना मिळालेल्या बातमीच्या अनुषंगाने गुन्हे शाखेचे अधीकारी व अंमलदार यांनी वलगाव पोलीस स्टेशन हददीतील चांदुरबाजार रोडवरील नया अकोला येथे अवैधरित्या सुरु



असलेल्या बनावट साबण व निरमा बनविणा-या दोन ठिकाणावरुन खालील इसमांना ताब्यात घेण्यात आले आहे.

. जुनेद खान यासीन खान वय २८ वर्ष रा. पाकिजा कॉलनी अमरावतीप्रफुल विष्णुपंत डोईफोडे वय ४८ वर्ष रा. न्यु म्हाडा कॉलनी अकोली अमरावती शेख भुरु शेख मुनीर वय ५० वर्ष रा. झेंडा चौक अमरावती , शेख कलीम शेख माजीद वय ४० वर्ष रा. बिस्मीला नगर लालखडी अमरावती वरील इसमांकडे सदर कारखाना चालविण्या संदर्भात कोणताही अधीकृत परवाना नसल्याचे दिसून आले आहे. सदर इसमांनी वरील मुददेमाल कोठून आणला व कुठे विक्री करत होते याबाबत अधीक तपास सुरु आहे.

ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेने केली आहे.

सदरची कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त परिमंडळ - १ गणेश शिंदे पोलीस, उपायुक्त परिमंडळ २ शाम घुगे, पोलीस उपायुक्त मुख्यालय तथा गुन्हे रमेश धुमाळ, स.पो.आ. गुन्हे शिवाजी बचाटे यांचे मार्गदर्शनात गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संदिप चव्हाण यांचे नेतृत्वात सपोनि मनिष वाकोडे, पोलीस अंमलदार सतिश देशमुख, मंगेश लोखंडे गजानन ढेवले, मनोज ठोसर, प्रशांत मोहोड, विशाल वाकपांजर यांनी केली.

# सुरांनो चंद्र व्हा कार्यक्रम हाऊसफुल

प्रतिनिधी ६ एप्रिल



- सोमेश्वर पुसदकरांना वाहिली स्वरांजली
- सांस्कृतिक भवन श्रोत्यांनी तुडूंब.

**अमरावती :** सोमेश्वर पुसतकर स्मृती प्रित्यर्थ अमरावती शहरात आझाद हिंद मंडळ, सोमेश्वर पुसतकर मित्रपरिवार आणि आम्ही सारे फाउंडेशन च्या वतीने 'हे सुरांनो चंद्र व्हा' या बहारदार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

अनिरुद्ध जोशी, राधिका भिडे, मंगेश बोरगावकर आणि मधुरा कुंभार या तरुण गायकांनी सादर केलेल्या हिंदी मराठी गीतांनी अमरावतीकर रसिक अगदी भारावून गेले होते.

मराठी संगीत आणि चित्रपटसृष्टीतील अत्यंत लोकप्रिय आणि हरहुन्नरी पार्श्वगायक मंगेश बोरगावकर याने विठू नामाचा गजर करत कार्यक्रमाला सुरुवात केली,

त्या नंतर 'येई हो विठ्ठले' , ' अबीर गुलाल ' , 'नाही कळले कधी' , 'डौल मोराच्या' , 'मनाच्या धुंदीत' आणि ' मन उधाण वाऱ्याचे ' गाणें सादर करून कार्यक्रमाची दमदार सुरुवात केली. ५७ व्या महाराष्ट्र राज्य चित्रपट व स्त्रीशक्ती सन्मान या पुरस्कारांच्या विजेत्या सारेगामा सिंगिंग सुपरस्टार आणि सुर नवा ध्यास नवा या लोकप्रिय कार्यक्रमांमुळे उदयास आलेल्या नव्या दमाच्या गायिका मधुरा कुंभार ने ' जगण हे न्यार झालं जी ' , ' दमादम मस्त कलंदर ' , ' लाल मेरी पत राखियो' , ' चाप तिलक' , 'निगाहे मिलाने को जी चाहता है' असे एक से एक बढकर एक गाणे सादर केले. सुर नवा ध्यास नवा या स्पर्धेत विजेतेपद पटकावत महाराष्ट्राचा महागायक ही मानाची ओळख निर्माण करणारा अनिरुद्ध जोशी याने अभी मुझ में कहीं , बदन पे सितारे लपेटे हुए , राधा ही बावरी, खंडेरायाच्या लग्नाला आणि मितवा हे गाणं सादर करून प्रेक्षकांमध्ये उत्साह निर्माण केला. आय पॉप स्टार या हिंदी म्युझिक रियालिटी शो मुळे प्रकाश झोतात आलेली राधिका भिडे ने ' सुंबरान मांडल' , 'बाहों में चले आओ' , आणि ज्या गाण्यांने तिची ओळख निर्माण झाली 'मन धावतया' हे गीत सादर करून वाह वा लुटली. ' अभी ना जाओ छोडकर' , ' केव्हा तरी पहाटे' , धुंदी कळ्यांना , पिया पिया पिया... अशी अजर अमर गीते सादर करून आशाताई भोसले यांना श्रद्धांजली देण्यात आली. की बोर्ड वर असणारे परिमल जोशी, प्रवीण जोंधळे, गिटार वाजविणारे अभिजीत भावे, तबल्यावर साथ देणारे प्रवीण बावणे, ढोलक वादक अनिकेत दहीकर, ऑक्टोपॅड वर असणारे अक्षय हरले यांच्या सात संगीतानं हा संपूर्ण सोहळा रंगला. कार्यक्रमाचे प्रस्ताविक अविनाश दुधे यांनी केले. या कार्यक्रमाला अमरावती शहराचे महापौर श्रीचंद तेजवानी, अमरावती च्या आमदार सुलभा खोडके, बडनेरा चे आमदार रवी राणा, माजी मंत्री डॉ. सुनील देशमुख, नगरसेवक विलास इंगोले, दिनेश बूब,बबलू शेखावत भोजराज काळे , डॉ प्रफुल्ल कडू, निलेश लाठीया, यांच्यासह राजकीय, कला, शिक्षण आणि विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी ज्ञानेश्वर हिवसे, प्रदीप देशपांडे, सुनील जयवंत देशमुख, एड श्रीकांत खोरगडे, दिलीप दाभाडे, अविनाश भडांगे, महेश गट्टाणी, प्रवीणसिंह रघुवंशी, भूषण पुसतकर, दिलीप पाटील, मयूर जलतारे ,वैभव कोंणलाडे , प्रवीण चौधरी , दिपक तायडे, संजय मुचळंबे, अरुण जोशी , शशांक लावरे , दत्तात्रय पुसदकर महाविद्यालयाचे प्रा. विजय दरणे, प्रा.विकास अडलोक , प्रा.गोविंद तिरमनवार , रेवण पुसतकर कृष्णा हिवसे, वेदांत डांगे यांनी परिश्रम घेतले.

संगीत प्रेमी अमरावतीकरांनी या सोहळ्याला भरभरून प्रतिसाद दिला. सभागृहातील मंचावरून सदाबहार गाण्यांचे फवारे उडत असताना या क्षणी अमरावती शहरातील ख्यातनाम चित्रकार विजय राऊत यांनी स्व आशा भोसले आणि सोमेश्वर पुसतकर यांचे सुंदर असे चित्र रेखाटून आपल्या कुंचल्यातून आशाताईंना भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली. या चित्रांची उपस्थित आणि मुक्त कंठाने प्रशंसा केली कार्यक्रमाचे निवेदन आसावरी देशपांडे, संचालन विशाल तराळ आणि आभार प्रदर्शन वैभव दलाल यांनी केले. हा संपूर्ण सोहळा अमरावतीकरांसाठी विशेष असा यादगार ठरला.

# मेळघाटात बुद्ध पौर्णिमेच्या लख्ख प्रकाशात निसर्ग अनुभव उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद

## ३३ वाघ आणि शेकडो वन्यजीवांचे पर्यटकांना दर्शन



प्रतिनिधी ६ एप्रिल

**अमरावती :** निसर्ग प्रेमी ज्या गोष्टीची आतुरतेने वाट पाहत होते, असा 'निसर्ग अनुभव' उपक्रम १ मे २०२६ रोजी बुद्ध पौर्णिमेच्या पर्वावर मेळघाट व्याघ्र प्रकल्पात उत्साहात पार पडला. पौर्णिमेच्या लख्ख चांदण्यात सलग १२ तास घनदाट वनातील २६४ मचाणांवर रात्रभर बसून पाणवठ्यावर येणाऱ्या वन्य प्राण्यांच्या निरीक्षणाचा थरारक अनुभव निसर्गप्रेमींनी मनमुरादपणे लुटला. मेळघाट व्याघ्र प्रकल्पांतर्गत अकोट, गुगामल, सिपना, मेळघाट वन्यजीव, अकोला आणि पांढरकवडा या सहा वन्यजीव विभागांमध्ये हा उपक्रम राबवण्यात आला होता.

या उपक्रमासाठी महाराष्ट्रातील मुंबई, पुणे, नागपूर, यवतमाळ, औरंगाबाद, अकोला, अमरावती या जिल्ह्यांसह मध्य प्रदेश आणि तेलंगणा राज्यातूनही पर्यटकांनी मोठ्या संख्येने गुगल फॉर्मद्वारे नोंदणी केली होती.

या रोमांचक मोहिमेत मेळघाट व्याघ्र प्रकल्पाच्या मुख्य क्षेत्रात ३० वाघ, १६ बिबट, ११० अस्वल, ४१३ रानगवा, ८५६ सांबर आणि १२१ नीलगाय या वन्यजीवांचे प्रत्यक्ष दर्शन झाले. तसेच पांढरकवडा वन्यजीव विभागात ३ वाघ, २ बिबट, १६४ रानडुक्कर, २५ अस्वल, ६७ नीलगाय व १५३ चितळ दिसून आले. अकोला वन्यजीव विभागातही १६ बिबट, २५ अस्वल, २ तडस, २३ कोल्हा, ६० रानडुक्कर, २०२ चितळ आणि ३६५ नीलगाय असे वैविध्यपूर्ण वन्यजीव पर्यटकांच्या दृष्टीस पडले. मचाणावर बसण्यापूर्वी संबंधित वन परिक्षेत्र अधिकाऱ्यांनी पर्यटकांना आवश्यक सूचना दिल्या होत्या आणि प्रत्येक निसर्गप्रेमीसोबत सुरक्षेसाठी वन कर्मचारी व निरीक्षणासाठी पत्रक देण्यात आले होते.

रात्रीच्या वेळी जंगलात शांतता, रातकिड्यांची किरकिर आणि हवेची झुळूक अशा नैसर्गिक वातावरणात वन्यजीवांना जवळून पाहणे, हा पर्यटकांसाठी एक विलोभनीय अनुभव ठरला. पौर्णिमेच्या प्रकाशात उजळलेले मेळघाटचे घनदाट जंगल आणि प्राण्यांचे आवाज यामुळे सहभागी पर्यटक भारावून गेले होते. मेळघाट व्याघ्र प्रकल्पाने केलेल्या उत्कृष्ट नियोजनाबद्दल आणि वनविभागाच्या सहकार्याबद्दल पर्यटकांनी समाधान व्यक्त करत, वाघांना व इतर वन्यजीवांना नैसर्गिक अधिवासात अनुभवल्याचा विशेष आनंद व्यक्त केला आहे.

# नगरसेवक प्रदीप मलिये यांनी केला गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

प्रतिनिधी ६ एप्रिल



**दर्यापूर :** दर्यापूर तालुक्यासाठी अभिमानाची बाब ठरावी अशी उल्लेखनीय कामगिरी एकविरा सायन्स व कॉमर्स महाविद्यालयातील गुणवंत विद्यार्थिनी हर्षिका कलत्री हिने करून दाखवली आहे. बारावी परीक्षेत तिने तब्बल ९०.१७३ गुण मिळवत तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. तिच्या या यशामुळे संपूर्ण तालुक्यात आनंद आणि अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

हर्षिकाने अत्यंत मेहनत, चिकाटी आणि शिस्तबद्ध अभ्यासाच्या जोरावर हे यश मिळवले आहे. तिच्या यशामागे तिचे आई-वडील, शिक्षकवर्ग आणि मित्रपरिवार यांचे मोठे योगदान आहे. नियमित अभ्यास, योग्य मार्गदर्शन आणि आत्मविश्वास या गोष्टींमुळेच तिने हे उच्च यश संपादन केले. महाविद्यालयाचे प्राचार्य व शिक्षकांनी हर्षिकाचे कौतुक करत तिच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. तसेच इतर विद्यार्थ्यांसाठी ती एक प्रेरणादायी उदाहरण ठरली आहे. तिच्या या यशामुळे एकविरा सायन्स व कॉमर्स महाविद्यालयाचे नावही उंचावले आहे.

हर्षिका कलत्री हिच्या या उल्लेखनीय यशाबद्दल तिचे मनःपूर्वक अभिनंदन व पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा!


# हातभट्टीची दारू पकडली; शहर गुन्हे शाखेची कारवाई

**अमरावती :** फ्रेजरपुरा हद्दीत हातभट्टीची दारू पकडण्यात आली. ही कारवाई शहर गुन्हे शाखेने केली आहे.

आज दि ०५/०५/२०२६ रोजी पोस्टे फ्रेजरपुरा हद्दी मध्ये गुन्हे शाखेचे पथक पेट्रोलिंग करीत असताना मिळालेल्या गुप्त माहिती वरून आरोपी कमलाबाई वामनराव चाचरकार वय ६० वर्ष, रा भुईपुरा ,वडाळी अमरावती ह्या राहत्या घरासमोरील आवारात हात भट्टी दारू विकताना मिळून आल्या वरून त्यांच्याकडूनहात भट्टी दारू २० लिटर जप्त केला असा एकूण ६००० रु मुद्दे माल जप्त करण्यात आला असून त्यांचे विरुद्ध पो.स्टे.फ्रेजरपूरा येथे कलम ६५(क)(फ)(ड) म.दा.का. अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येत आहे.



# ते पन्नास दिवस ही कादंबरी अभ्यासक्रमात कायम



## विद्यार्थ्यांच्या न्यायालयीन लढ्याला मोठे यश

प्रतिनिधी ६ एप्रिल

**अमरावती :** नागपूर उच्च न्यायालयाच्या हस्तक्षेपानंतर विद्यापीठाचा निर्णय बदलला; विद्यार्थ्यांना 'ते पन्नास दिवस' व 'धग' दोन्ही कादंबऱ्यांचा पर्याय संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या बी.ए. भाग दोनच्या अभ्यासक्रमातील 'ते पन्नास दिवस' ही कादंबरी रद्द करण्याच्या निर्णयाला नागपूर उच्च न्यायालयाने स्थगिती दिली आहे. 'ऑल इंडिया स्टुडन्ट फेडरेशन'च्या विद्यार्थ्यांनी दाखल केलेल्या याचिकेनंतर विद्यापीठाने दोन्ही कादंबऱ्यांवर — 'ते पन्नास दिवस' ही कादंबरी आणि 'धग'ही कादंबरी — परीक्षा देण्याचा पर्याय उपलब्ध करून दिला आहे.

त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टळले असून, या निर्णयाचे स्वागत करण्यात येत आहे.

# इयत्ता 12 वी पुरवणी परीक्षेसाठी ऑनलाईन अर्ज प्रक्रिया सुरू

प्रतिनिधी ६ एप्रिल



**अमरावती :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे तर्फे घेण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२वी) जून-जुलै २०२६ पुरवणी परीक्षेसाठी आवेदनपत्रे ऑनलाईन पद्धतीने भरण्याचे वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. फेब्रुवारी-मार्च २०२६ परीक्षेचा निकाल दि. २ मे २०२६ रोजी ऑनलाईन जाहीर झाल्यानंतर ही पुरवणी परीक्षा जून-जुलै २०२६ मध्ये घेण्यात येणार आहे. पुनर्परीक्षार्थी, यापूर्वी नावनोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी, श्रेणीसुधार योजनेअंतर्गत विद्यार्थी तसेच घ्ऊ्छ विषय घेणारे विद्यार्थी यांना या परीक्षेसाठी ऑनलाईन अर्ज करता येणार आहे. विद्यार्थ्यांनी आवेदनपत्रे महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची अधिकृत वेबसाइट www.mahahsscboard.in वर भरावीत, असे पुणे राज्य मंडळाचे सचिव डॉ. दिपक माळी यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे.

नियमित शुल्कासह आवेदनपत्र भरण्याची मुदत ५ ते १५ मे २०२६ असून, विलंब शुल्कासह १६ ते २० मे २०२६ पर्यंत अर्ज करता येणार आहे. महाविद्यालयांनी RTGS/NEFT द्वारे परीक्षा शुल्क २१ मे पर्यंत जमा करणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्यांची यादी व प्रिलिस्ट २५ मे पर्यंत विभागीय मंडळाकडे सादर करावी लागणार आहे. अर्ज सबमिट केल्यानंतर महाविद्यालयांना 'कॉलेज लॉगिन'मधून प्रिलिस्ट उपलब्ध होणार असून, त्याची पडताळणी करून विद्यार्थ्यांच्या स्वाक्षऱ्या घेणे आवश्यक राहणार आहे. तसेच प्राचार्यांनी प्रत्येक पानावर शिक्का व स्वाक्षरी करणे बंधनकारक आहे.

ऑनलाईन अर्ज भरताना फेब्रुवारी-मार्च २०२६ परीक्षेत अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांची माहिती स्वयंचलितपणे उपलब्ध होणार आहे. श्रेणीसुधार योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांना सलग तीन संधी (जून-जुलै २०२६, फेब्रुवारी-मार्च २०२७, जून-जुलै २०२७) दिल्या जाणार आहेत. शुल्क भरण्यासाठी घ्घ्घ्ढ बँकेच्या व्हर्च्युअल खात्यात NEFT/RTGS द्वारेच रक्कम जमा करावी लागणार असून, जुन्या बँक चलनांचा वापर करता येणार नाही. तसेच रोख स्वरूपात शुल्क स्वीकारले जाणार नाही. विहित शुल्क न भरल्यास विद्यार्थ्यांची प्रवेशपत्रे उपलब्ध करून दिली जाणार नाहीत. तसेच अर्ज भरण्याच्या मुदतीत कोणतीही वाढ दिली जाणार नसल्याचे मंडळाचे सचिव डॉ. दिपक माळी यांनी स्पष्ट केले आहे.

# शासकीय जमिनीवरील अतिक्रमण नियमानुकूल करा

प्रतिनिधी ६ एप्रिल

**अमरावती :** महानगरपालिकेच्या हद्दीतील शासकीय जमिनीवरील अतिक्रमण नियमानुसार नियमानुकुल करण्याबाबत महत्त्वपूर्ण कार्यवाही सुरू करण्यात येत आहे. जिल्हाधिकारी महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक जन-२०१६/प्र.क्र.२०/जमीन-२, दिनांक २५/०३/२०२६ नुसार महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील तरतुदीनुसार शासकीय जमिनीवरील अतिक्रमण नियंत्रणासाठी शासनाने शासन निर्णय पारित केला असून. दिनांक ०१/०१/२०११ पर्यंतच्या पुरावा असणारे शासकीय जागेवरील रहिवासी अतिक्रमण,( नदी नाले पूर नियंत्रण लाईन विविध आरक्षणे रस्ते विकास योजना आरक्षण, वगळून )अतिक्रमण नियमितीकरणाच्या संदर्भात जिल्हास्तरीय समितीची बैठक मा. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली होती.

सदर बैठकीतील निर्णयानुसार अतिक्रमणावरील नियमनुकूल करण्याची कार्यवाही संबंधित विभागाने तातडीने सुरू करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. त्यानुसार मा. जिल्हाधिकारी यांच्या सूचनेनुसार महानगरपालिका अमरावती येथील सहायक संचालक, नगर रचना विभाग यांच्या मार्फत आवश्यक कार्यवाही सुरू करण्यात येत असून महसूल व वन विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या शासन निर्णय क्रमांकः जमीन-२०२६/प्र.क्र.२०/जमीन-१, दिनांक २५ मार्च २०२६ अन्वये राज्यातील शासकीय जमिनींवरील दि. ०१/०१/२०११ पर्यंतची निवासी अतिक्रमणे विशिष्ट अटींवर नियमित या शासन निर्णयानुसार अंमलबजावणी अमरावती महानगरपालिका क्षेत्रात टप्प्याटप्प्याने सुरू करण्यात येत आहे ज्यामध्ये

- ☐ अतिक्रमण धारकाने दिनांक ०१/०१/२०११ पूर्वीचे केलेले अतिक्रमण धारक हा या शासन निर्णयानुसार केवळ निवासी प्रयोजनार्थ केलेले अतिक्रमण नियामानुकुल करण्यास पात्र असेल.
- ☐ १५०० चौ. फूट क्षेत्रापर्यंतची अतिक्रमणे नियमित केली जातील, ज्यामध्ये ५०० चौ. फुटापर्यंतचे क्षेत्र विनामूल्य असेल. विहित शुल्क (कब्जेहक्क रक्कम) भरल्यानंतर पती-पत्नीच्या संयुक्त नावाने 'भोगवटादार वर्ग-२' म्हणून मालकी हक्काचे आदेश निर्गमित केले जातील.
- ☐ नदीपात्र, नाले, रस्ता, पुराची निळी/लाल रेषा, वन जमीन, विविध आरक्षित जागा आणि प्रतिबंधित क्षेत्रातील अतिक्रमणे नियमित केली जाणार नाहीत. अधिकृत माहितीसाठी कोणत्याही मध्यस्थावर विश्वास न ठेवता थेट महानगरपालिका येथील सहाय्यक संचालक नगर रचना विभागाशी संपर्क करावा आणि या प्रक्रियेत सहकार्य करावे.

तसेच प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत शासकीय जागेवरील कच्चे घरे असलेल्या पात्र लाभार्थी यांचे ईं कार्ड मंजूर करून ईं वितरित करण्याचे आदेश बजावण्यात आलेले आहेत बिच्छू टेकडी १, बिच्छू टेकडी २, चपराशीपुरा, आदर्श नेहरु नगर, लालखडी (गंभीरपूर), वैंकय्यापुरा, अशोक नगर, गौतम नगर, भीम नगर, महात्मा फुले नगर नवसारी, मसानगंज (झाडपीपुरा), विलास नगर नं.१ (निमोनिया सोसायटी), विलास नगर नं. २, सिद्धार्थ नगर, वडाळी, कपिल वस्तू नगर, राजीव गांधी नगर (चिलम छावणी), राजमाता नगर नं.१, माताखीडकी, इंदिरा नगर (फ्रेजरपुरा), मसानगंज -२ (शासकीय जागेवरील), रमाबाई आंबेडकर नगर, राजमाता नं.२, अण्णाभाऊ साठे नगर क्र.२, हनुमान नगर, चमन नगर, सद्गुरू नगर बडनेरा, लुंबिनी नगर, बेलपुरा, महादेवखोरी, बजरंग टेकडी, इंदिरा नगर (बडनेरा), मिलचाळ (बडनेरा), स्वीपर कॉलोनी, आदिवासी नगर (टापर होस्टेल), पांच बंगला, वडरपुरा भाग १, फ्रेजरपुरा भाग १,२,३, कुंभारवाडा, मोतीनगर (कंपासपुरा), माताफैल, गांधी आश्रम, झाडीफैल बडनेरा, आनंद नगर, वडरपुरा भाग -२ मधील लाभार्थी मंजूर करण्यात आलेले असून त्यांनी आपले हमीपत्र तहसील कार्यालय येथे सादर करून अमरावती तहसील आणि भूमी अभिलेख कार्यालयाशी संपर्क साधून आपले ईं कार्ड प्राप्त करून घ्यावे.- असे आवाहन जिल्हाधिकारी आशिष येरेकर (भाप्रसे ) यांनी केले आहे. सदर बैठकीत उपायुक्त नरेंद्र वानखडे, जिल्हा सहा. आयुक्त विकास खंडारे जिल्हा प्रशासन अधिकारी, अमरावती, मनपा सहाय्यक संचालक नगर रचना सागर वानखडे, अधिक्षक महेश शिंदे व उपअधिक्षक गजानन डोईफोडे भुमि अभिलेख, अमरावती, प्रधानमंत्री आवास योजनेचे पालिका आर्थिक तज्ञ विपिन त्रिवेदी, अभियंता जिशान शाह, समाज विकास तज्ञ प्रज्वल शेंडे, आर्चीनोवा डिझाईन इंक पियुष हांडे, प्रतीक ठाकरे उपस्थित होते.

# महानगरपालिका उर्दू हायस्कूलचा निकाल 88 टक्के लागला




प्रतिनिधी ६ एप्रिल

**अमरावती :** शिक्षण सभापती ॲड. प्रिती रेवणे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. इयत्ता बारावीचा निकाल जाहीर झाला यामध्ये महानगरपालिका उर्दू हायस्कूल जमिल कॉलनी (इंग्लिश मीडियम) चा निकाल ८८३ लागला. विद्यार्थ्यांचा गुण गौरव सोहळा मनपा उर्दू हाय स्कूल जमील कॉलनी येथे आयोजित करण्यात आला होता यावेळी अध्यक्ष म्हणून ॲड. प्रिती रेवणे शिक्षण सभापती ह्या उपस्थित होत्या. गुण गौरव मध्ये प्रथम क्रमांक- आयेशा समन अब्दुल समद ७३ टक्के, द्वितीय क्रमांक - तहेमा अजीन अतहर अहमद ६९.३३टक्के, तृतीय क्रमांक - जवेरीया तसलीम अब्दुल नईम ६३.५० टक्के, या गुणी विद्यार्थिनींचा गुण गौरव करण्यात आला. यावेळी शिक्षण सभापती यांनी आपल्या अध्यक्षीय मार्गदर्शन करताना महानगर पालिका व्यवस्थापनच्या शाळेमध्ये प्राविण्य प्राप्त विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीकरिता शुभेच्छा दिल्या. तसेच मनपा शाळा कुठेच कमी नाहीत या निकालामधून दिसून येते, असे प्रतीपादन त्यांनी केले.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
बुधवार दि ६ मे २०२६ http://epaper.citynewssuperfast.com



समग्र शिक्षा आंदोलनाचा ५७ वा दिवस

## समग्र शिक्षा कर्मचाऱ्यांच्या समस्यांचे करा निरसन...

# महाराष्ट्रात प्रथमच महिला करणार ‘मुंडण’!

## * आंदोलन करणाऱ्या कर्मचाऱ्यांना न्यायाची प्रतिक्षा, मात्र शासन देते शिक्षा

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

प्रगतीशील महाराष्ट्रात महिला पहिल्यांदाच मुंडण करणार करणार असून ही स्थिती खुद्द राज्यसरकारने शिक्षण विभागातील कंत्राटी कर्मचाऱ्यांवर आणली आहे. ९ मार्च २०२६ पासून राज्यातील समग्र शिक्षा अभियानाचे तीन हजाराचे वर कंत्राटी कर्मचारी आंदोलन करत असून यापूर्वी सरकारचे लक्ष वेधण्यासाठी २० एप्रिल रोजी पुरुषांनी मुंडण आंदोलन केले आहे. आंदोलनाला बसलेल्या कर्मचाऱ्यांच्या मृत्यूनंतर सरकार आंदोलनकर्त्यांची दखल घेणार का ? असा प्रश्न आझाद मैदानावर आंदोलनाला बसलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांनी विचारला आहे.

देशात लाडक्या बहिणी व महिला आरक्षणाचा मुद्दा चर्चेत असताना प्रगतीशील महाराष्ट्रातील लाडक्या बहिणींना आपल्या रास्त मागण्यासाठी ५६ दिवस उपोषण व इतर आंदोलन करावे लागत आहे. उन्हाच्या तडाख्यात ५६ दिवसाच्या आंदोलनानंतर सुद्धा एकाही मंत्र्याने दखल घेतली नसल्याने नाईलाजाने कर्मचाऱ्यांनी महिला मुंडण आंदोलनाचा इशारा दिला आहे. ७ तारखेपर्यंत सरकारने नियमित करण्यासंदर्भात ठोस निर्णय न घेतल्यास ८ मे समग्र शिक्षा अभियान अंतर्गत सर्व महिला कर्मचारी मुंडण करणार असल्याचे निवेदन शासनास सादर केले आहे.

मागील २० ते २५ वर्षापासून शासन सेवेत कायमच्या प्रतीक्षेत असलेले समग्र शिक्षा अभियानाचे तीन हजारांवर कर्मचारी ९ मार्चपासून तीन हजारवर कर्मचारी मुंबईतील आझाद मैदानावर बेमुदत उपोषण आणि अन्नत्याग आंदोलन करत आहे. विशेष म्हणजे समग्र शिक्षा अभियान अंतर्गत दिव्यांग विभागातील




अर्ध्या कर्मचाऱ्यांना २०२४ मध्ये सेवेत नियमित करण्यात आले.

एकाच अभियानातील अर्धे कर्मचारी कायम व सेवाजेष्ठ कर्मचारी कंत्राटी असल्याने राज्यात असंतोषाचे वातावरण आहे.सन २००१ पासून समग्र शिक्षा अभियान सुरू झाले त्याच वेळी विद्यार्थ्यांना गुणवत्ता पूर्ण शिक्षण व शिक्षकांना मार्गदर्शन व्हावे यासाठी विषयसाधन व्यक्ती, विशेष शिक्षक, डेटा एंट्री ऑपरेटर, लेखा, एम आय एस कोऑर्डिनेटर, इंजिनिअर, जिल्हा समन्वयक, सहायक कार्यक्रमाधिकारी कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील विविध पदावर असणारे कर्मचारी, अशी अनेक पदे सहा-सहा महिन्यांच्या करारावर व मानधन तत्त्वावर भरली गेली होती. गत २० ते २५ वर्षात प्रत्यक्ष सेवेदरम्यान तब्बल २५७ कर्मचारी विविध कारणाने मृत्यूमुखी पडले.

### आंदोलनाचे ५६ दिवस :

सरकारचे लक्ष आपल्या मागणीकडे वेधण्यासाठी कधी स्वतःच्या रक्ताने पत्र लिहून मुख्यमंत्री यांचेकडे स्वेच्छा मरणाची परवानगी मागितली. कधी रस्ता रोको, वृक्ष चढाई, थाळीनाद, पुरुषांचे मुंडण आंदोलन तर कधी गाण्यांच्या माध्यमातून लक्ष वेधण्याचे काम केले. ५६ दिवसात अनेक खासदार,आमदार, विविध पक्ष व संघटनाचे नेते आझाद मैदानावर आले मात्र ह मंत्रिमंडळातील एकही मंत्री आझाद मैदानावर फिरकले नाही हे विशेष.

### मुख्यमंत्र्यांनीही केले नेतृत्व :

विरोधी पक्षात असताना भाजप मधील सुधीर मुनगंटीवार, एकनाथ खडसे, विनोद तावडे,देवेंद्र फडणवीस यांनी २००८ पासून समग्र शिक्षा आंदोलनाचे नेतृत्व करत तत्कालीन सरकारवर आसूड ओढले. आमची सत्ता आल्यास पहिल्या कॅबिनेटमध्ये कायम करण्याचे अभिवचन २०१२ मध्ये देवेंद्र फडणवीस यांनी दिले. २०२५ मध्ये हिवाळी अधिवेशन आंदोलन दरम्यान स्वतः मुख्यमंत्र्यांनी कर्मचाऱ्यांचे उपोषण सोडण्यासाठी कायमचे आश्वासन दिले होते.

## थोडक्यात

### नवनियुक्त पोलीस उपनिरीक्षकपदी डिंगाबर मोरे

#### घनश्याम मापारी यांच्याकडून स्वागत



● सिटी न्युज ब्युरो @ रिसोड ●

आत्ताच पार पडलेल्या महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या पोलीस उपनिरीक्षक पदाकरिता परीक्षेच्या निकालात मोहजा इंगोले येथील सामान्य शेतकरी कुटुंबातील डीगाबर मोरे यांची पोलीस उपनिरीक्षक म्हणून निवड झाली त्याबद्दल त्यांचा हिंदवी स्वराज्याची संस्थापक शिवछत्रपती यांची प्रतिमा देऊन यथोचित स्वागत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे रिसोड तालुका समन्वयक घनश्याम मापारी यांनी त्यांच्या निवासस्थानी जाऊन केले आहे डीगाबर मोरे हे वाशिम पोलीस दलात पोलीस कॉन्स्टेबल या पदावर कार्यरत आहेत त्यांच्यासमवेत त्यांची लहान बंधू नंदू मोरे हे देखील मुंबई पोलीस मध्ये कार्यरत आहेत यांच्या रूपाने मोहजा इंगोले सारख्या छोट्याशा गावातून तिसरा पोलीस उपनिरीक्षक होण्याचा बहुमान मिळाला आहे त्यामुळे गावाचे नाव रोशन करण्यात त्यांचा सिंहाचा वाटा आहे. त्यांची प्रेरणा इतर तरुणांनी घेऊन अशाच पद्धतीने गावाचे व कुटुंबाचे नावलौकिक करावे. असे गौरवोद्गार घनश्याम मापारी यांनी व्यक्त केले त्यांच्या समवेत जळगाव जामोद येथे पोलीस उपनिरीक्षक असलेले मोहजा इंगोले गावचे चे रहिवाशी नारायण सरकटे, अंकुश कालापाड, उपस्थित होते.

### मानोरा-कारंजा प्रशिक्षणाचा जिल्हाधिकाऱ्यांकडून आढावा



● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

जनगणना २०२७ ही अत्यंत महत्त्वाची राष्ट्रीय प्रक्रिया असून तिची अचूक, पारदर्शक व वेळेत पूर्तता करण्यासाठी सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी काटेकोरपणे प्रशिक्षण आत्मसात करणे आवश्यक आहे.असे प्रतिपादन जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी केले.

मानोरा व कारंजा येथे जनगणना २०२७ अनुषंगाने आयोजित प्रशिक्षण कार्यक्रमास जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी भेट देऊन कामकाजाचा सविस्तर आढावा घेतला. यावेळी ते बोलत होते. त्यांनी प्रशिक्षण केंद्रांतील प्रत्यक्ष कार्यवाहीची पाहणी केली तसेच प्रशिक्षणार्थी व संबंधित यंत्रणेशी संवाद साधून माहिती संकलन प्रक्रिया, डिजिटल प्रणालीचा वापर आणि क्षेत्रीय अंमलबजावणीबाबत मार्गदर्शन केले. प्रशिक्षणादरम्यान जनगणना कार्यासाठी वापरण्यात येणाऱ्या पद्धती, अचूक माहिती नोंदणी, तसेच समन्वय यंत्रणेचे महत्त्व यावर विशेष भर देण्यात आला. जनगणना कार्यात कोणतीही त्रुटी राहू नये यासाठी प्रत्येक स्तरावर दक्षता घेण्याच्या स्पष्ट सूचना त्यांनी यावेळी दिल्या. मानोरा व कारंजा येथील प्रशिक्षणाची तयारी समाधानकारक असल्याचे निरीक्षण नोंदवत जिल्हाधिकाऱ्यांनी पुढील टप्प्यातील काम अधिक गतिमान करण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले. यावेळी उपविभागीय अधिकारी कैलास देवरे, तहसीलदार रवी महाले यांच्यासह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.


## रब्बी खत-बियाणे मदतीपासून शेतकरी वंचित !

### हेक्टरी दहा हजार रुपयांची मदत रखडली; तहसीलदारानी लक्ष देण्याची गरज

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

राज्यातील अतिवृष्टी व पुरामुळे खरीप हंगामातील पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी रब्बी पेरणीसाठी प्रती हेक्टर १० हजार रुपयांची मदत जाहीर केली होती. मात्र, घोषणा होऊन रब्बीचा हंगाम उलटून गेला असतानाही पिंप्री सरहद्द (ता. रिसोड) येथील पाच एकर पेक्षा जास्त क्षेत्रफळ असलेले दहा विस शेतकरी या मदतीपासून अद्याप वंचित असल्याचे चित्र आहे.

गावातील सुमारे १० ते २० शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ मिळालेला नसल्याची माहिती समोर आली आहे. खरीप हंगामात अतिवृष्टीमुळे झालेले नुकसान सहन करताना शेतकरी आधीच आर्थिक संकटात सापडले होते. त्यानंतर रब्बी पेरणीसाठी अनेकांनी व्याजाने पैसे घेऊन बियाणे व खते खरेदी केली आणि मोठ्या आशेने पेरणी केली. शासनाकडून जाहीर झालेल्या मदतीमुळे आर्थिक आधार मिळेल, अशी अपेक्षा होती; मात्र प्रत्यक्षात मदत न मिळाल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजी वाढत आहे.दरम्यान, रब्बी हंगाम संपून पिकांचा मालही घरात आला असून आता पावसाळा सुरू होण्याच्या मार्गावर आहे. तरीदेखील त्या मदतीची रक्कम खात्यात जमा न झाल्याने शेतकरी पुन्हा आर्थिक



तणावाखाली आले आहेत. आधीच पुर व अतिवृष्टीने शेतकरी हैराण झाला असून खरीप हंगामातील पिके वाहून गेली. त्यानंतर रब्बी पेरणीसाठी घेतलेले कर्ज कसे फेडायचे, असा प्रश्न अनेक शेतकऱ्यांसमोर उभा ठाकला आहे. शासनाने जाहीर केलेल्या या मदतीत प्रती हेक्टर १० हजार रुपये अतिरिक्त देण्याचे तसेच ही मदत जास्तीत जास्त ३ हेक्टरपर्यंत देण्याचे नमूद केले होते. अतिवृष्टीग्रस्त व बाधित शेतकऱ्यांना प्राधान्याने मदत देण्याचे निर्देशही प्रशासनाला देण्यात आले होते. ही मदत रब्बी पेरणीच्या काळात किंवा दिवाळीपूर्वी खात्यात जमा होणे अपेक्षित होते; मात्र अनेक पात्र शेतकरी अजूनही या लाभापासून वंचित आहेत. विशेष म्हणजे, पाच एकरपेक्षा कमी क्षेत्र असलेल्या काही शेतकऱ्यांना ही मदत मिळाल्याचे सांगितले जात असताना, पाच एकरपेक्षा जास्त क्षेत्र असलेले सुमारे दहा ते वीस शेतकरी अजूनही या खत-बियाणे अनुदानापासून वंचित आहेत. त्यामुळे संबंधित शेतकरी अजूनही या मदतीच्या प्रतीक्षेत असून प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची मागणी होत आहे. पिंप्री सरहद्द येथील शेतकऱ्यांनी तहसील प्रशासनाकडे तातडीने दखल घेऊन पात्र शेतकऱ्यांच्या खात्यात रब्बी मदतीची रक्कम जमा करावी, अशी मागणी केली आहे. अन्यथा आगामी पावसाळी हंगामात शेतकऱ्यांवरील आर्थिक संकट आणखी गडद होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

## रिसोडमध्ये अवकाळी पावसाची हजेरी !

### तीव्र उकाडयांमुळे नागरिकांना दिलासा, शेतकरी मात्र चिंतेत

● सिटी न्युज ब्युरो @ रिसोड ●

वाशिमच्या रिसोड शहरासह काही ग्रामीण भागात आज वादळी वाऱ्यासह जोरदार अवकाळी पावसाने हजेरी लावली. दिवसभराच्या तीव्र उकाड्यानंतर अचानक बदललेल्या वातावरणामुळे नागरिकांना दिलासा मिळाला असला, तरी या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांच्या चिंतेत वाढ झाली आहे.

वाशीम जिल्ह्यातील रिसोड शहर आणि परिसरात दुपारनंतर अचानक ढग दाटून आले आणि वादळी वाऱ्यासह जोरदार अवकाळी पावसाला सुरुवात झाली. उकाड्यामुळे त्रस्त झालेल्या नागरिकांना या पावसामुळे




काहीसा दिलासा मिळाला. मात्र, या वेळी झालेल्या पावसामुळे भाजीपाला पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. विशेषतः मिरची, टोमॅटो आणि इतर भाजीपाला पिकांना या पावसाचा फटका बसण्याची भीती शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे. अचानक बदललेल्या हवामानामुळे शेतीचे नियोजन विस्कळीत होण्याची शक्यता असून यामुळे शेतकरी चिंतेत आहेत.

## ‘मिशन लक्ष्यवेध’ विभागीय कुस्ती व वेटलिफ्टिंग निवड चाचणी

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे मार्फत राबविण्यात येत असलेल्या ’मिशन लक्ष्यवेध’ या धोरणात्मक योजनेअंतर्गत कुस्ती व वेटलिफ्टिंग या क्रीडा प्रकारासाठी विभागीय क्रीडा निपुणता केंद्र, विभागीय क्रीडा संकुल, अमरावती येथे स्थापन करण्यात येत आहे.

या केंद्रांमध्ये निवड झालेल्या खेळाडूंना निवासी स्वरूपात दर्जेदार व तंत्रशुद्ध क्रीडा प्रशिक्षण, क्रीडा साहित्य, निवास व भोजन सुविधा, क्रीडा विज्ञान विषयक सहाय्य, देश-विदेशातील स्पर्धांमध्ये सहभाग तसेच



शासन मान्यतेनुसार वैद्यकीय विमा सुरक्षा सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे.सदर विभागीय क्रीडा निपुणता केंद्र कार्यान्वित करण्याच्या अनुषंगाने कुस्ती व वेटलिफ्टिंग या क्रीडा प्रकारांसाठी विभागस्तरीय खेळाडू निवड चाचणीचे आयोजन गुरुवार, दि.७ मे २०२६ रोजी करण्यात आले आहे.

## मान्सूनपूर्व कामे १५ मे पूर्वी पूर्ण करा-जिल्हाधिकारी

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

मान्सूनपूर्व तयारीला गती देत सर्व यंत्रणांनी समन्वयाने व काटेकोर नियोजनाने काम करावे, नागरिकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य द्यावे, असे निर्देश जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी केले.

आगामी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी कार्यालयातील राजे वाकाटक सभागृहात मान्सूनपूर्व आढावा सभा घेण्यात आली. यावेळी ते बोलत होते. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे, उपविभागीय अधिकारी वैशाली देवकर, अतिरिक्त जिल्हा पोलिस अधीक्षक लता फड, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शाहू भगत यांच्यासह विविध विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.पुढे बोलतांना

### मान्सूनपूर्व तयारीबाबत आढावा सभा



जिल्हाधिकारी कुंभेजकर यांनी जिल्ह्यात संभाव्य पूरस्थिती, अतिवृष्टी तसेच नैसर्गिक आपत्तींचा सामना करण्यासाठी करण्यात आलेल्या पूर्वतयारीचा सविस्तर आढावा यावेळी घेण्यात आला. परिवहन विभागाने जिल्ह्यातील अपघातप्रवण स्थळांची पाहणी करून सविस्तर अहवाल सादर करावा, असेही यावेळी त्यांनी सांगितले.नालेसफाईची काम तातडीने व गुणवत्तापूर्ण पद्धतीने पूर्ण करावीत, ड्रेनेज व्यवस्था सक्षम ठेवावी, पूरप्रवण भागांची ओळख करून आवश्यक उपाययोजना राबवाव्यात, तसेच धरणे व तलाव पातळीवर सतत निरीक्षण ठेवावे, असे निर्देशही जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी दिले.आरोग्य विभागाने साथीच्या रोगांवर नियंत्रणासाठी पुरेसा औषधसाठा, फॉगिंग मोहीम, स्वच्छता व जनजागृती कार्यक्रम राबवावेत. आपत्कालीन रुग्णसेवा अखंडित राहण्यासाठी रुग्णवाहिका व वैद्यकीय पथके सज्ज ठेवावीत, वीज वितरण व सार्वजनिक बांधकाम विभागाने देखभाल-दुरुस्तीची कामे वेळेत पूर्ण करून सेवा अखंडित ठेवावी, तर आपत्ती व्यवस्थापन नियंत्रण कक्ष २४ तास कार्यरत ठेवण्याचे निर्देश देण्यात आले. आपत्ती व्यवस्थापनाच्या बाबतीत स्वयंसेवी संस्थांचे चांगले सहकार्य आजपर्यंत मिळाले असून पुढेही असे सहकार्य मिळावे.अशी अपेक्षा जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी व्यक्त केली. सर्व उपविभागीय अधिकारी, सर्व तहसीलदार, सर्व मुख्याधिकारी व स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी यावेळी उपस्थित होते.

## जि.प.पदाधिकाऱ्यांची निवासस्थाने ओसाड!

### अवस्थेतचा गंभीर वास्तव समोर; प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

वाशिममध्ये जिल्हा परिषद पदाधिकाऱ्यांसाठी उभारण्यात आलेली शासकीय निवासस्थाने सध्या ओसाड अवस्थेत असल्याचं गंभीर वास्तव समोर आलं आहे. तब्बल सव्वा वर्षांपासून ही घरे कुलूपबंद असून देखभालीअभावी त्यांची दुरवस्था होत चालली आहे. त्यामुळे याकडे लक्ष देण्याची गरज निर्माण झाली.




वाशीम मध्ये कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च करून उभारण्यात आलेली ही शासकीय निवासस्थाने वापराअभावी निष्क्रिय पडली आहेत. निवासस्थानाच्या परिसरात मोठ्या प्रमाणात कचऱ्याचे ढीग, झाडाझुडपे वाढली असून इमारतींच्या भिंतींना तडे गेलेले दिसत आहेत. अनेक ठिकाणी रंग उडाल्याने इमारतींची अत्यंत दुरवस्था झाली आहे. या घरांचा योग्य वापर होत नसल्यामुळे शासकीय संपत्तीची मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. यामुळे प्रशासनाच्या कार्यक्षमतेवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.प्रशासनाकडून इतका निधी खर्च करून घरे बांधली पण ती वापरातच नाहीत. आता त्यांची अवस्था दिवसेंदिवस वाईट होत आहे. प्रशासनाने तात्काळ निर्णय घेऊन ही घरे वापरात आणावीत अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.जर वेळेत या शासकीय व्यवस्थानाची दुरुस्ती आणि योग्य वापराचा निर्णय घेतला नाही.तर भविष्यात या इमारतींच्या दुरुस्तीसाठी मोठा आर्थिक भार शासनाला सहन करावा लागू शकतो.आता प्रशासन याकडे कितपत गांभीर्याने लक्ष देते आणि या शासकीय निवासस्थानांचा योग्य उपयोग करण्यासाठी काय पावले उचलते. हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.

## बीज उत्पादक शेतकऱ्यांना न्याय द्या - लखनसिंह ठाकूर

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

मंगरूळपीर महाराष्ट्र राज्यातील बीज उत्पादक शेतकऱ्याची बीज उत्पादक कंपन्याकडून होणारी वारंवार फसवणूक व आर्थिक पिळणूक शेतकरी बांधवांवर होणारा सततचा अन्याय थांबवावा व त्यांना न्याय द्यावा अशी मागणी भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष लखनसिंह ठाकूर यांनी केली आहे.

जिल्ह्यासह अनेक बीज उत्पादक शेतकरी बांधव अनेक वर्षापासून गंभीर अडचणीचा सामना करीत आहे राज्यातील वीज उत्पादक कंपन्याकडून शेतकऱ्याची सतत आर्थिक पिवळणूक नाहक मनस्ताप सहन करावा लागत आहे अनेक बीज उत्पादक कंपन्याकडून शेतकरी बांधवा कडून बीज उत्पादन बीज घेताना करत



असलेले करार हे अत्यंत अस्पष्ट असून त्यामध्ये अनेक जाचक अटी टाकल्यामुळे कंपन्यामार्फत कायम शेतकऱ्यांची फसवणूक च्या घटना खूप मोठ्या प्रमाणात जिल्ह्यासह संपूर्ण राज्यात घडत आहे. वरील या सर्व घटनेमुळे वारंवार शेतकरी बांधव सामना करत असून सर्व मागण्याचा विचार करून वाशिम जिल्ह्यासह राज्यातील समस्त शेतकरी बांधवांना न्याय मिळवून द्यावा असे निवेदन भाजपाचे उ.भा जिल्हाध्यक्ष श्री लखनसिंह ठाकूर यांनी केली आहे.

# बर्ड फ्लू की उष्माघात? कोंबड्यांच्या मृत्यूमुळे कुक्कुटपालकांमध्ये धास्ती !

## नमूने गोळा केले जाणार, भीतीचे वातावरण

प्रतिनिधी ६ मे

**खामगाव :** खामगाव परिसरात कोंबड्यांच्या अचानक होत असलेल्या मृत्यूंच्या घटनांनी कुक्कुटपालकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. उष्माघात की संसर्गजन्य आजार, याबाबत संभ्रम कायम असून, प्रशासनाच्या स्पष्टीकरणावरही प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.राज्यात सध्या कोंबड्यांच्या मृत्यूच्या घटनांनी गंभीर स्वरूप धारण केले आहे. नंदुरबारमध्ये तब्बल दोन लाख पक्ष्यांचा मृत्यू झाल्यानंतर शेजारील जिल्ह्यांतही संशयास्पद घटना समोर येत आहेत. अशातच खामगाव आणि परिसरात ३० ते ५० च्या गटात कोंबड्यांचे मृत्यू होत असल्याच्या घटना निदर्शनास येत आहेत. त्यामुळे हा प्रकार उष्माघातामुळे होत आहे की एखाद्या संसर्गजन्य रोगाचा संकेत आहे, याबाबत संभ्रम निर्माण झाला आहे.खामगाव तालुक्यातील पिंपळगाव राजा येथील नोंदणीकृत पोल्ट्री फार्म पशुसंवर्धन विभागाच्या नियमित देखरेखीखाली आहेत; मात्र रोहणा, वर्णा, कोन्टी, काळेगाव, भालेगाव बाजार, उमरा, अटाळी, शेलोडी, बोरजवळा, जयपूर लांडे आदी भागांत असंघटित कुक्कुटपालन मोठ्या प्रमाणावर होत असल्याने संसर्गाचा धोका अधिक असल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे कुक्कुटपालक, शेतकरी आणि पशुपालकांमध्येही चिंतेचे सावट पसरले आहे.



### खामगावात आजारी सेवा मोहीम सुरू!

पशुसंवर्धन विभागाने आजारी सेवा मोहीम हाती घेतली असून, जनावरांच्या आरोग्य तपासण्या सुरू आहेत. संशयास्पद प्रकरणांवर विशेष लक्ष ठेवण्यात येत आहे. आजारी सेवा मोहिमेला परिसरात चांगला प्रतिसाद लाभत आहे. पशुधनाच्या आरोग्याची काळजी घेण्याच्या अनुषंगाने शिबीरेही घेतली जात आहेत.

# वृद्धाचा एक लाखांचा ऐवज चोरणारा आरोपी जेरबंद !

## मुद्देमाल हस्तगत: शहर पोलिसांची कारवाई

प्रतिनिधी ६ मे

**खामगाव :** बसस्थानक परिसरात वृद्ध प्रवाशाला लक्ष्य करून एक लाख रुपयांच्या सोन्याच्या दागिन्यांची चोरी करणाऱ्या चोरट्याला शहर पोलिसांनी काही तासांतच जेरबंद केले. सीसीटीव्ही फुटेज आणि तांत्रिक तपासाच्या आधारे आरोपीला अटक करून चोरीस गेलेला संपूर्ण मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असून, पोलिसांच्या तत्परतेमुळे गुन्ह्याचा वेगाने उलगडा झाला आहे. बसस्थानक परिसरात एका वृद्धाची सुमारे एक लाख रुपयांच्या सोन्याच्या दागिन्यांची चोरी झाल्याची घटना उघडकीस आली. पोलिसांनी तत्पर कारवाई करत आरोपीला अटक करून चोरीस गेलेला सर्व मुद्देमाल हस्तगत केला. फिर्यादी भगवान देवराव डुबल (८२, रा. शिवाजी नगर, जुना फैल खामगांव यांनी खामगाव शहर पोलिस ठाण्यात दाखल केलेल्या तक्रारीनुसार, ४ मे रोजी सकाळी सुमारे ७:३० वाजताच्या सुमारास ते पत्नीसह बसस्थानकात बसमध्ये चढत असताना अज्ञात चोरट्याने त्यांच्या पायजम्याच्या खिशातून सोन्याचे दागिने लंपास केले. चोरीस गेलेल्या ऐवजामध्ये एकूण १ लाख रुपयांचा मुद्देमाल होता. तपासादरम्यान सीसीटीव्ही फुटेज व तांत्रिक माहितीच्या आधारे अंबादास सुगदेव सुळोकार (४२, रा. वडोदे ले-आऊट, घाटपुरी, खामगाव) हा आरोपी निष्पन्न झाला. ही कारवाई पोलिस अधीक्षक नीलेश तांबे, अपर पोलिस अधीक्षक श्रेणिक लोढा व उपविभागीय पोलिस अधिकारी प्रदीप पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक आर. एन. पवार व सुरेंद्र अहेरकर यांच्या आदेशाने एपीआय विकास पाटील, पोलिस हेडकॉन्स्टेबल सागर भगत, भीमराव वानखेडे, प्रदीप मोठे तसेच गणेश कोल्हे व अमरदीपसिंह पार पाडली.

### बंजारा बहुल समिती स्थापन; इच्छुकांकडून प्रस्ताव मागविले

**बुलढाणा :** वसंतराव नाईक तांडा/वस्ती सुधार योजना तसेच यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेंतर्गत हाती घ्यावयाच्या विविध विकास कामांसाठी बंजारा बहुल बुलढाणा जिल्ह्यासाठी बंजारा बहुल समिती स्थापन करण्यात येणार आहे.त्या अनुषंगाने बुलढाणा जिल्ह्यातील विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गातील इच्छुक व्यक्तींनी प्रस्ताव सादर करावेत.

# घाटपुरी येथे संशयातून पत्नीवर प्राणघातक हल्ला

प्रतिनिधी ६ मे



**खामगाव :** तालुक्यातील घाटपुरी येथील इंदिरानगर परिसरात पतीने दारूच्या नशेत पत्नीवर संशय घेत, विटेच्या तुकड्याने डोक्यात वार करून गंभीर जखमी केल्याची धक्कादायक घटना ३ मे रोजी संध्याकाळी घडली. या प्रकरणी खामगाव ग्रामीण पोलिस ठाण्यात आरोपी पतीविरुद्ध सोमवारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, पीडित महिला संगीता महादेव ससाणे (३५) या ३ मे रोजी सायंकाळी ६ वाजण्याच्या सुमारास घरी होत्या. त्यावेळी त्यांचे पती महादेव ससाणे हे दारूच्या नशेत घरी आला. त्याने पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेत वाद घालण्यास सुरुवात केली. संगीता यांनी विरोध केल्याने संतप्त झालेल्या आरोपीने त्यांना घरासमोरील अंगणात ओढून नेले. तेथे पडलेला विटेचा तुकडा उचलून त्यांच्या डोक्यात वार केला. या हल्ल्यात त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली.

घटनेनंतर जखमी अवस्थेत असलेल्या संगीता ससाणे यांनी दुसऱ्या दिवशी, ४ मे रोजी भाच्याला गौरव दादाराव तायडे (रा.पिंप्री अढाव) याला फोन करून बोलावून घेतले व त्याच्या मदतीने पोलिस ठाणे गाठले. या प्रकरणी भारतीय न्यायसंहिता अंतर्गत कलम ११८(१), ११५(२), ३५१(३) व ३५२ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास शिवाजीनगर पोलिस करीत आहेत.

# किरकोळ कारणावरून दोन कुटुंबांत हाणामारी

प्रतिनिधी ६ मे

**खामगाव :** शहरातील जुना फैल परिसरात किरकोळ कारणावरून व पूर्ववैमनस्यातून दोन कुटुंबांमध्ये झालेल्या वादाचे हाणामारीत रूपांतर झाले. या प्रकरणी परस्परविरोधी तक्रारींवरून पोलिसांनी सहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी शाहीन परविन व त्यांचे पती शेख हकीम कुरेशी हे ४ मे रोजी सायंकाळी सुमारे ८ वाजता त्यांच्या घरी उपस्थित होते. त्यावेळी शेख जावेद शेख मलंग, शेख मलंग भोला, शे. जावेद (सर्व रा. जुना फैल, खामगाव) यांनी संगनमत करून त्यांच्या घरी प्रवेश केला. आरोपींनी फिर्यादी व त्यांच्या पतीला अश्लील शिवीगाळ केली. यानंतर आरोपींनी शेख हकीम कुरेशी यांना लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली. दरम्यान, मुख्य आरोपी शेख जावेद याने लोखंडी पाईपने त्यांच्या डोक्यात वार करून त्यांना गंभीर जखमी केले. तसेच, पुढे तक्रार केल्यास जिवे मारण्याची धमकी दिली. घटनेनंतर फिर्यादींनी तातडीने पोलिसांशी संपर्क साधून तक्रार नोंदवली. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी त्वरित हालचाल करून जखमींचा वैद्यकीय अहवाल तयार केला.

या तक्रारीच्या आधारे व वैद्यकीय अहवालानुसार खामगाव शहर पोलिस ठाणे येथे भारतीय न्याय संहिता अंतर्गत कलम ११८(१), ११५ (२), ३५१ (३), ३५२, ३(५) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, याच घटनेच्या अनुषंगाने दुसऱ्या बाजूनेही तक्रार दाखल करण्यात आली आहे. फिर्यादी शेख जमील यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, आरोपी इरफान उस्मान कुरेशी व हकीम उस्मान कुरेशी यांनी त्यांना अडवून शिवीगाळ केली व मारहाण केली. यावेळी इरफान कुरेशी याने लोखंडी पाईपने त्यांच्या डोक्यात वार करून गंभीर जखमी केले.

# बाल योग शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

प्रतिनिधी संग्रामपूर

एकलारा बानोदा येथील जिल्हा परिषद माध्यमिक प्राथमिक केंद्र शाळेत स्वामी रामदेव व आचार्य बालकृष्ण यांच्या प्रेरणेतून निःशुल्क बाल योग शिबिराचे आयोजन करण्यात आले असून, या उपक्रमाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

३ मे ते १५ मे २०२६ या कालावधीत दररोज सकाळी ५ ते ६ यावेळेत हे शिबिर सुरू आहे.

या शिबिरात विद्यार्थ्यांना प्रार्थना, सूक्ष्म व्यायाम, प्राणायाम, विविध योगासने, सूर्यनमस्कार, दंड-बैठका यांचे प्रशिक्षण दिले जात आहे. यासोबतच संतुलित आहार आणि आदर्श दिनचर्येचे महत्त्वही पटवून दिले जात आहे. भारत स्वाभिमानचे तालुका अध्यक्ष महादेव धुडे यांच्या मार्गदर्शनाखाली पतंजली योग समितीच्या वतीने या १५ दिवसीय शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

योग शिक्षक भास्कर भोंडे, गौरव भोंडे यांच्यासह भारत करांगळे, बळीराम धुळे, दाते, व्ही.डी. हागे, धुळे, गोपाल झगळे आणि ग्रामसेविका माहूलकर हे प्रशिक्षण देत आहेत.

# सर्वांगीण विकास बालसुसंस्कार शिबिर संपन्न



**शेगांव :** शहरातील श्रीमद् भागवत सेवा समिती खिडकीवेश शेगाव शिबिर प्रमुख श्रीरामभाऊ अकर्ते यांच्या संयुक्त विद्यमानाने गेल्या पाच वर्षापासून सर्वांगीण विकास बालसुसंस्कार शिबिर आयोजित करण्यात येत आहे या शिबिराचे उदघाटण श्री राजेश रामदास आसोलकर अध्यक्ष श्री क्षत्रिय माळी परिषद वाडेगाव यांच्या हस्ते करण्यात आले

हे शिबीर ह भ प विशाल महाराज देशमुख चारठाणा व त्यांचे सहकारी ह भ प विनोद महाराज देशमुख वृंदावन व ह भ प नागेश महाराज शिंदे वाशिम यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न होत आहे

या शिबिरामध्ये आपली परंपरा, संस्कृती धर्माचरण मर्यादा संयम स्वाध्याय जबाबदारी व कर्तृत्व ,टाळ ,मृदंग, पावली ,या विषयाची मानवी जीवनासोबत सांगळ घालण्यासाठी व कोवळ्या बाल मनावर सुसंस्कारांचे बीजारोपण करण्यासाठी हे शिबिर आयोजित केले आहे हे शिबिर यशस्वी करण्याकरिता विनोद अकर्ते डी. के. शेगोकर , शंकर घाटोळ गजानन गणगणे, मंगेश खेरडे ,संतोष जावरकर, अवधूत शेगोकार, बापूराव देशमुख, पुरुषोत्तम धनोकर, मोहन पिंपळे ,दिनेश लहाने व निलेश कलोरे , शिवशंकर शेगोकार, यांनी परिश्रम घेतले. उन्हाळयाची सुटी कारणीभूत लागावी या उद्देशाने दरवर्षी संस्कार शिबिर घेण्यात येते त्याला चांगला प्रतिसाद मिळतो.

# अज्ञात चोरट्यांकडून सात बकऱ्यांची चोरी

**खामगाव :** तालुक्यातील पिंप्री देशमुख येथे रात्रीच्या वेळी अज्ञात चोरट्यांनी ७बकऱ्या चोरल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. चोरट्यांनी बकऱ्या पळवण्यासाठी पांढऱ्या रंगाच्या कारचा वापर केल्याचे समोर आले आहे. या प्रकरणी खामगाव ग्रामीण पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला पोलिस अज्ञात चोरट्यांचा शोध घेत आहेत.

या प्रकरणी महादेव संतोष दांडगे (वय ४२, रा. पिंप्री देशमुख, ता. खामगाव, जि. बुलढाणा) यांनी पोलिसांत फिर्याद दिली आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, फिर्यादी दांडगे यांच्याकडे एकूण २० लहान-मोठ्या बकऱ्या असून त्या घरासमोरील मोकळ्या जागेत कुंपणात बांधून ठेवण्यात आल्या होत्या. ४ मे रोजी पहाटेच्या सुमारास फिर्यादींची आई बाहेर आल्यावर काही बकऱ्या गायब असल्याचे निदर्शनास आले. त्यांनी तातडीने महादेव यांना कळवले. महादेव यांनी पाहणी केली असता, २० पैकी ७बकऱ्या जागेवर नसल्याचे आढळून आले. यानंतर परिसरात चौकशी केली असता शेजारी भैयाभाऊ अंमलकार यांनी सांगितले की, ते रात्री सुमारे ३ वाजता बाहेरगावीहून परतले असता, बकऱ्यांच्या कुंपणाजवळील रस्त्यावर पांढऱ्या रंगाची कार उभी असल्याचे त्यांनी पाहिले होते. या आधारे अज्ञात चोरट्यांनी सुमारे ५६ हजार रुपये किमतीच्या ७ बकऱ्या कारमध्ये टाकून पळवून नेल्याचे निष्पन्न झाले आहे.

# आधीच उन्हाळ्यात वीज बिल वाढले; त्यात अतिरिक्त सुरक्षा ठेवीचा बोजा!

**- पारा ४३ अंशावर पोहोचला**
**- उन्हामुळे नागरिकांची होरपळ**
**- आता खिशालाही बसतेय झळ!**

**खामगाव :** उन्हाळ्यामुळे वीज वापर वाढून बिलात वाढ झालेल्या ग्राहकांना आता महावितरणकडून अतिरिक्त सुरक्षा ठेवीचा आणखी एक आर्थिक फटका बसत आहे. एप्रिल महिन्याच्या वीज बिलांसोबतच ही अतिरिक्त ठेव भरण्याच्या नोटिसा पाठवण्यात आल्या आहेत. ग्राहकांच्या वाढत्या वीज वापरामुळे संभाव्य थकबाकीचा धोका लक्षात घेऊन ही सुरक्षा ठेव आकारली जाते. जिल्ह्यातील वीजग्राहकांना यासाठी स्वतंत्र बिले देण्यात आली असून, त्यामुळे या महिन्यात ग्राहकांवर अतिरिक्त आर्थिक भार पडणार आहे.

ग्राहकांच्या मागील एका वर्षातील सरासरी वीज वापराच्या आधारे अतिरिक्त सुरक्षा ठेवीची रक्कम निश्चित केली जाते. त्यानुसार काहींना ५० रुपये, तर काहींना ५ हजार रुपयांपर्यंतचे बिल मिळत आहे.महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या विनियम १३.११ नुसार, वीजग्राहकांनी भरलेल्या सुरक्षा ठेवीवर त्यांना व्याजाचा लाभही दिला जातो. ही व्याजदराची रक्कम रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने निश्चित केलेल्या दराइतकी असते. संबंधित व्याजाची गणना करून ती रक्कम थेट वीज बिलामध्ये समायोजित केली जाते आणि ग्राहकांना परतावा दिला जातो. त्यामुळे ग्राहकांनी भरलेली सुरक्षा ठेव ही पूर्णपणे निष्फळ राहत नाही, तर त्यावर व्याजाच्या स्वरूपात काही प्रमाणात आर्थिक परतावा मिळत असल्याने हा दिलासा ठरतो.

**दरवर्षी एप्रिलमध्ये आकारली जाते सुरक्षा ठेव**

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या विद्युत पुरवठा संहिता-२०२१ मधील विनियम १३.११ नुसार वीजग्राहकांकडून सुरक्षा ठेव आकारली जाते. दरवर्षी तिची पुनर्गणना केली जाते आणि आर्थिक वर्ष संपल्यानंतर एप्रिलमध्ये तिचे बिल आकारले जाते.

# डोणगाव येथे कोठार फोडून 30 क्विंटल हळदीच्या बेण्याची चोरी !

## ९० हजारांचा मुद्देमाल लंपास; शेतकऱ्यांमध्ये चिंता

**डोणगाव :** अज्ञात चोरट्यांनी कोठाराचे कुलूप तोडून ३० क्विंटल हळदीच्या बेण्याची चोरी केल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणात सुमारे ९० हजार रुपयांचा मुद्देमाल लंपास करण्यात आला असून, डोणगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी विठ्ठल विश्वनाथ भुतेकर (वय ४४, रा. डोणगाव) यांनी पेरणीसाठी विकत आणलेले हळदीचे बेणे डोणगाव येथील राजेश रमेश सावजी यांच्या कोठारात साठवून ठेवले होते. ४ मे रोजी सायंकाळी सहा वाजल्यापासून ते ५ मे रोजी पहाटे साडेपाच वाजेपर्यतच्या कालावधीत अज्ञात चोरट्यांनी कोठाराचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. त्यानंतर प्रति क्विंटल तीन हजार रुपये दराने ३० क्विंटल हळदीचे बेणे लंपास केले.या प्रकरणी ५ मे रोजी डोणगाव पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली. पोलिसांनी भारतीय न्याय संहितेच्या संबंधित कलमान्वये अज्ञात आरोपींविरुद्ध गुन्हा नोंदवला आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस हवालदार अरुण सानप हे ठाणेदारांच्या मार्गदर्शनाखाली करीत आहेत.दरम्यान, शेतीसाठी साठवून ठेवलेल्या बेण्याची चोरी झाल्याने परिसरातील

शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. अलीकडील काळात डोणगाव परिसरात चोरीच्या घटना वाढल्याची चर्चा असून, चोरट्यांचा वाढता धुमाकूळ आणि अद्याप न लागलेले तपास यामुळे पोलीस यंत्रणेच्या कार्यक्षमतेबाबतही प्रश्न उपस्थित होत आहेत.

# चिमुकल्यांच्या पोटामध्ये गुडगुड; समर डायरियाचा वाढता प्रादुर्भाव !

## उष्णतेच्या तीव्रतेचा आरोग्यावर परिणाम; ओपीडीत रुग्ण वाढले, पालकांमध्ये चिंता!

प्रतिनिधी ६ मे

**खामगाव :** वाढत्या उन्हाच्या तीव्रतेमुळे शहरासह परिसरात 'गॅस्ट्रो' व समर डायरियाच्या रुग्णसंख्येत लक्षणीय वाढ होत आहे. शासकीय, तसेच खासगी रुग्णालयांच्या 'ओपीडी' मध्ये उलटी, जुलाब, ताप आणि अशक्तपणाच्या तक्रारी घेऊन येणाऱ्या रुग्णांचे प्रमाण वाढले आहे. विशेषतः लहान मुलांमध्ये या आजाराचे प्रमाण अधिक आढळत असल्याने पालकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.



वैद्यकीय तज्ज्ञांच्या मते, उन्हाळ्यात अन्नपदार्थ लवकर खराब होणे, दूषित पाण्याचा वापर आणि अस्वच्छता यांमुळे हे आजार झपाट्याने पसरतात. वेळेवर उपचार न घेतल्यास निर्जलीकरणासारख्या गंभीर समस्या उद्भवू शकतात. त्यामुळे नागरिकांनी स्वच्छता पाळणे, सुरक्षित पिण्याच्या पाण्याचा वापर करणे आणि आहाराबाबत विशेष दक्षता घेणे आवश्यक असल्याचे आवाहन करण्यात येत आहे.उष्णतेमुळे अन्न लवकर खराब; जीवाणूंची वाढ ! उन्हाळ्यात तापमानात मोठी वाढ झाल्याने अन्नपदार्थ लवकर खराब होण्याची शक्यता वाढते. अशा अन्नामध्ये जीवाणू वेगाने वाढतात आणि ते अन्न सेवन केल्यास पोटाचे विकार उद्भवतात. त्यामुळे ताजे व स्वच्छ अन्नच सेवन करणे आवश्यक असल्याचे तज्ज्ञ सांगतात.अस्वच्छ किंवा दूषित पाणी पिणे तसेच रस्त्यावर उघड्यावर विकले जाणारे अन्न सेवन करणे ही 'गॅस्ट्रो' व समर डायरियाची प्रमुख कारणे आहेत. स्वच्छतेचा अभाव आणि अन्न साठवणुकीतील निष्काळजीमुळे संसर्गाचा धोका अधिक वाढतो.

### शहरात वाढले गॅस्ट्रो, समर डायरियाचे रुग्ण!

गत काही दिवसांत शहरातील विविध रुग्णालयांमध्ये गॅस्ट्रो व समर डायरियाच्या रुग्णांची संख्या लक्षणीय वाढल्याचे चित्र दिसून येत आहे. यामुळे आरोग्य यंत्रणेवरही ताण वाढू लागला आहे.

**काय काळजी घ्याल?**

उन्हाळ्यात उकळून किंवा शुद्ध केलेले पाणीच पिणे, उघड्यावर विकले जाणारे अन्न टाळणे, हात स्वच्छ धुण्याची सवय ठेवणे, ताजे व स्वच्छ अन्न सेवन करणे आणि शरीरात पाण्याची कमतरता होऊ न देणे अत्यंत महत्त्वाचे आहे. तसेच लक्षणे दिसल्यास विलंब न करता डॉक्टरांकडे जावे.

# स्व–गणनेला नागरिकांचा अल्प प्रतिसाद; जनजागृतीची गरज !

**खामगाव :** देशात सुरू झालेल्या १६ व्या जनगणनेच्या पहिल्या टप्प्याला १ मेपासून प्रारंभ झाला असून, यामध्ये 'स्व-गणना' प्रक्रियेला सुरुवात करण्यात आली आहे; मात्र या उपक्रमाला नागरिकांकडून अपेक्षित प्रतिसाद मिळताना दिसत नाही. स्व-गणना ही पूर्णपणे ऑनलाइन तांत्रिक प्रक्रियेवर आधारित असल्यामुळे अनेक नागरिकांना ती समजून घेण्यात अडचणी येत आहेत. आवश्यक मार्गदर्शन व माहितीच्या अभावामुळे बहुसंख्य नागरिक या प्रक्रियेपासून दूर राहत असल्याचे चित्र सध्या दिसून येत आहे.

विशेषतः ग्रामीण व निमशहरी भागात डिजिटल साक्षरतेचा अभाव, इंटरनेट वापराबाबतची मर्यादित माहिती आणि तांत्रिक प्रक्रियेची गुंतागुंत यामुळे नागरिक स्व जनगणना पूर्ण करण्यास कचरतात. अनेकांना नोंदणी कशी करावी, तसेच माहिती भरण्याची अचूक पद्धत काय आहे याबाबत स्पष्टता नाही. यामुळे शासनाने सुरू केलेल्या या महत्त्वाच्या उपक्रमाला अपेक्षित प्रतिसाद मिळत नसल्याची खंत व्यक्त केली जात आहे.

### अनेक नागरिकांना पुरेशी माहिती नाही!

आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने जनगणना प्रक्रिया सुलभ करण्याचा प्रयत्न प्रशासनाकडून करण्यात येत आहे; मात्र या प्रक्रियेचा प्रभावी लाभमिळण्यासाठी नागरिकांना सक्षम करणे तितकेच महत्त्वाचे ठरत आहे. स्व-गणना उपक्रमाबाबत अद्यापही अनेक नागरिकांमध्ये पुरेशी माहिती नसल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे या प्रक्रियेला अपेक्षित प्रतिसाद मिळत नाही.

# सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड

बुधवार, दि. ६ मे २०२६ http://epaper.citynewssuperfast.com


# महापालिका कर्मचाऱ्यांना मार्च महिन्याच्या जीएसटी अनुदानाची अद्याप प्रतीक्षाच

प्रतिनिधी ६ मे

**अकोला :** महानगरपालिकेचे कर्मचारी सध्या विविध आर्थिक अडचणींचा सामना करत आहेत. आठव्या वेतन आयोगाची थकबाकी न मिळाल्याने अकोला महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांनी यापूर्वी महापालिका प्रशासनाला बेमुदत संपाचा इशारा दिला होता. आता राज्यातील सर्व २९ महानगरपालिकांच्या कर्मचाऱ्यांना अद्याप मार्च २०२६ चे जीएसटी अनुदान मिळालेले नाही.

नगर विकास विभागाने २० दिवसांपूर्वी जीएसटी अनुदानाची फाईल वित्त विभागाकडे पाठवली आहे, परंतु त्यावर अद्याप कोणताही निर्णय झालेला नाही. राज्यातील सर्वच महानगर पालिकेच्या कर्मचारी संघटनांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून याची माहिती दिली आहे. सर्वस्वी वेतनावर अवलंबून असलेल्या महापालिकेच्या कर्मचाऱ्यांना जीएसटी अनुदान न मिळाल्याने कर्मचारी सरकारवर अधिकाधिक संतप्त होत आहेत.

## कर्मचारी संघटनांचे नेते मूग गिळून

दरम्यान, एप्रिल महिनाही संपला आहे. तरीही, जीएसटी अनुदानाची फाईल गेल्या २० दिवसांपासून वित्त विभागात प्रलंबित आहे. महापालिका कर्मचाऱ्यांच्या पगाराचा प्रश्न गंभीर आहे. अर्थमंत्री या नात्याने मुख्यमंत्र्यांनी तो गांभीर्याने घेतला नाही. पालिका कर्मचाऱ्यांना जीएसटी अनुदानाची राशी न मिळाल्याने गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे ही राशी वेळेवर मिळण्यासाठी बेमुदत संप पुकारल्याशिवाय कर्मचाऱ्यांसमोर दुसरा पर्याय उरलेला नाही .

### महापालिकेतील सर्वच कर्मचारी संघटनेचे नेते मूग गिळून गप्प

मागील चार वर्षांपासून महापालिकेत प्रशासक राज सुरू झाल्याने सर्व कर्मचारी संघटनेचे नेते साहेबगिरीत मशगूल झाले आहेत त्यांना आंदोलनाचा विसर पडला आहे. महापालिकेत प्रशासक राज संपल्यानंतर व जनप्रतिनिधीचे सरकार आल्यानंतरही कर्मचारी संघटनांचे नेते जागे होण्यास तयार नाहीत त्यामुळे कर्मचाऱ्यांच्या या मागणीकडे सरकारला जाब विचारण्यासाठी एकाही कर्मचारी संघटनेच्या नेत्याने आवाज न उचलल्याने कर्मचाऱ्यांमध्ये नाराजी निर्माण होत आहे

# 15 मे पूर्वी राज्यातील सर्व शाळांचे होणार स्ट्रक्चरल ऑडिट !

प्रतिनिधी ६ मे

## ♦ महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेने दिले आदेश



**अकोला :** महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेने शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षेला प्राधान्य देण्यासाठी आवश्यक उपाययोजना करणे सुरू केले आहे. मान्सूनच्या आगमनापूर्वी राज्यातील सर्व शाळांचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्याचे आदेश महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेने दिले आहेत.१५ में पूर्वी शाळांच्या इमारती, वर्ग खोल्या, स्वयंपाक गृह, आणि स्वच्छतागृहांची मान्सूनपूर्व तपासणी करण्याचे आदेश दिले आहेत. केवळ इमारतीची मजबूतीच नव्हे तर इतर २७ महत्त्वाच्या मुद्द्यांचीही पडताळणी केली जाईल. तसे पाहता विद्यार्थ्यांच्या सुरक्षेबाबत तडजोड केली जात नाही. दरवर्षीच शाळांच्या खोल्यांची पडताळणी होते. परंतु यंदा मात्र स्ट्रक्चरल ऑडिटच्या स्पष्ट सूचना दिल्या आहेत. महाराष्ट्र शिक्षण परिषदेमार्फत राज्यातील सर्व प्राथमिक शाळांना हे परिपत्रक पाठविण्यात आले आहे. त्यात १५ मे २०२६ पर्यंत स्ट्रक्चरल ऑडिट पूर्ण करणे बंधनकारक करण्यात आले आहे. पावसाळ्यात इमारतींची पडझड, गळती, विद्युत अपघात, आणि आरोग्य समस्या उद्भवू नयेत म्हणून शासनाने कड़क निर्देश जारी केले आहेत. शालेय शिक्षण राज्यमंत्री डॉक्टर पंकज भोयर यांनी याबाबत शाळांना कड़क निर्देश दिले आहेत. त्यामुळे शाळांच्या इमारती, वर्गखोल्या, स्वयंपाक घर, आणि शौचालयांची सखोल तपासणी करावी लागणार आहे. भेगा पडलेल्या भिंती, कुमकूवत छत, सैल झालेले प्लास्टर, गळणारे छत, तुटलेल्या खिडक्या दरवाजे, आणि गटार व्यवस्थेची तात्काळ दुरुस्ती करणे आवश्यक राहील. वर्गात पाणी शिरू नये म्हणून विशेष खबरदारी घेण्याचे आदेश सुद्धा देण्यात आले आहेत.१५ मे २०२६ पर्यंत सर्वात शाळांना स्ट्रक्चरल ऑडिट बंधनकारक करण्यात आले आहे या सोबतच पावसाळ्यानंतर डेंगू मलेरिया प्रतिबंधासाठी आरोग्य तपासणी आणि जनजागृती मोहीम राबवली जाईल त्यासाठी सर्व शाळांनी तपासणी अहवाल संबंधित अधिकाऱ्यांकडे सादर करणे बंधनकारक आहे पालन न केल्यास कठोर कारवाई केली जाईल असा इशारा सरकारने दिला आहे

# अकोल्यातील अनिकट परिसरात मानवी सापळा आढळला

प्रतिनिधी ६ मे



**अकोला :** शहरातील अनिकट परिसरात आज एक मानवी सापळा आढळल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. घटनेची माहिती मिळताच जुने शहर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत तपास सुरू केला आहे. हा सापळा नेमका कोणाचा असावा या बाबतीत पोलिस तपासात निष्पन्न होऊ शकेल.

अकोल्यातील अनिकट परिसरात एका व्यक्तीचा सापळा आढळून आला. स्थानिक नागरिकांना संशयास्पद अवस्थेत सापळा दिसून आल्याने त्यांनी तत्काळ पोलिसांना माहिती दिली.


माहिती मिळताच जुने शहर पोलीस घटनास्थळी दाखल झाले असून परिसराची पाहणी करत पंचनामा करण्यात आला. हा सापळा काही दिवसांपूर्वीचा असावा, अशी शक्यता वर्तवली जात आहे. सदर प्रकरणात मृत व्यक्तीची ओळख पटवणे हे पोलिसांसमोर मोठे आव्हान असून, सापळा पुढील तपासासाठी पाठवण्यात येणार असल्याची माहिती आहे.

दरम्यान, या घटनेमुळे अनीकट परिसरात भीती आणि चर्चेचे वातावरण निर्माण झाले आहे. पोलिसांकडून सर्व बाजूंनी तपास सुरू असून पुढील माहिती तपासानंतर स्पष्ट होणार आहे.

# अकोला सर्वोपचार रुग्णालयात वार्ड बॉय गैरहजर

प्रतिनिधी ६ मे

## ♦ रूग्णांच्या नातेवाईकांची परवड



**अकोला :** सर्वोपचार रुग्णालयात सकाळी ८ ते ४ वाजेपर्यंत स्मार्ट कंपनीचे वॉर्डबॉय प्रशासनाने नियुक्त केले असूनही वॉर्ड बॉय कार्यालयीन वेळेत रुग्णालयात गैरहजर असतात. त्यामुळे एका वार्डातून दुसऱ्या वार्डात किंवा सोनोग्राफी, एक्स-रे करण्यासाठी नातेवाईकांना स्ट्रेचरवर रूग्णांना न्यावे लागते. वार्ड बॉयची रुग्णाला अत्यंत गरज असते अशा वेळेस वार्डबॉयचे काम रुग्णाच्या नातेवाईकाला करावे लागत आहे त्यामुळे स्मार्ट कंपनीची वॉर्ड बॉय ची सेवा ही फक्त कागदावर दिसुन येत आहे वॉर्ड बॉय च्या सेवेवर प्रशासन लाखो रुपयांचा खर्च दर महिन्याला करते तरीही वार्ड बॉय कर्तव्यावर गैरहजर आढळून येत असल्यामुळे रुग्णांना वार्ड बॉय ला शोधत फिरावे लागत आहे रुग्णालय प्रशासनाने क्रिस्टल कंपनी आणि स्मार्ट कंपनी ला वॉर्डबॉय चे कंत्राट दिले असून वॉर्ड बॉय मनमानी पद्धतीने काम करत आहे वॉर्ड बॉय च्या कामावर कामावर ज्यांची जबाबदारी आहे लक्ष ठेवण्याची ते सुपरवायझर सुपर स्पेशलिटी हॉस्पिटलला एसी मध्ये बसून राहतात वॉर्ड बॉय कर्तव्यावर हजर आहे की गैरहजर याची चौकशी सुद्धा सुपरवायझर करत नाही त्यामुळे रुग्णालयात रुग्णाच्या नातेवाईकांना स्ट्रेचर वर रुग्णाला टाकून नेण्याची वेळ येत आहे रुग्णालयातील अपघात कक्षामध्ये गंभीर स्वरूपाचे अपघात झालेले रुग्ण प्रथम उपचारासाठी रुग्णालयात दाखल होतात अशा वेळेस रुग्णाचा सिटीस्कॅन करणे सोनोग्राफी व एक्स-रे साठी वार्ड बॉय ची गरज पडते वॉर्ड बॉय उपलब्ध नसल्यामुळे रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे त्यामुळे क्रिस्टल कंपनी आणि स्मार्ट कंपनीचे वॉर्ड बॉय नेमके जातात कुठे दर महिन्याला यांची पगार विना काम करता कशी होते खोटे मस्टर रजिस्टर भरून बेकायदेशीर बिल कसे पास होतात तसेच वरिष्ठ अधिकारी या गंभीर प्रकाराकडे लक्ष का देत नाही हा संशोधनाचा विषय आहे त्यामुळे स्मार्ट कंपनी व क्रिस्टल कंपनीची चौकशी करण्याची मागणी सर्व स्तरातून होत आहे

# एसटीच्या महिला वाहकावर हल्ला करणाऱ्या आरोपीला शिक्षा

प्रतिनिधी ६ मे

**अकोला :** जिल्हा व सत्र न्यायालयाने एसटी बसमधील महिला वाहकावर हल्ला करून शासकीय कर्तव्यात अडथळा निर्माण करणाऱ्या आरोपीस शिक्षा सुनावली आहे. जिल्हा व सत्र न्यायाधीश ए. डी. क्षीरसागर यांच्या न्यायालयाने हा निकाल मंगळवार, ५ मे रोजी दिला. या प्रकरणातील आरोपी मोहन रामचंद्र काळे (६०) रा. तापडिया नगर, जुने शहर, अकोला याला भादंवि कलम ३५३ अंतर्गत दहा दिवस साधी कैद व एक हजार रुपये दंड, दंड न भरल्यास सात दिवस साधी कैद तसेच कलम ३२३ अंतर्गत पाचशे रुपये दंड, दंड न भरल्यास तीन दिवस साधी कैद अशी शिक्षा ठोठावण्यात आली. प्रकरणातील फिर्यादी दीपिका हिंमतराव अंभोरे या एसटी वाहक असून, त्यांनी जुने शहर पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीनुसार, ६ जानेवारी २०१९ रोजी त्या औरंगाबाद-अकोला मार्गावर कर्तव्य बजावत होत्या. सकाळी अकोला येथे पोहोचल्यानंतर बस परतीच्या प्रवासासाठी निघाली असताना वाशिम बायपासजवळील ढोर बाजार परिसरात ही घटना घडली. तिकीट तपासणी दरम्यान आरोपीकडे तिकीट काढण्यास गेल्यावर त्याने चिखलठाणा (औरंगाबाद) येथील तिकिटाची मागणी केली. संबंधित मार्गावर ते तिकीट उपलब्ध नसल्याचे सांगितल्यावर आरोपीने संतापून वाद घातला. त्यानंतर शिवीगाळ करत फिर्यादीच्या गालावर थप्पड मारली. असा आरोप होता. सरकार पक्षातर्फे एकूण सहा साक्षीदारांची साक्ष नोंदविण्यात आली. उपलब्ध पुरावे व युक्तिवादांच्या आधारे न्यायालयाने आरोपीविरुद्ध गुन्हा सिद्ध झाल्याचे निष्पन्न करून वरीलप्रमाणे शिक्षा सुनावली. या खटल्यात अतिरिक्त सरकारी वकील, ॲड. राजेश अकोटकर यांनी सरकार पक्षाची बाजू मांडली. त्यांना कोर्ट पैरवी अधिकारी एएसआय फजलूर रेहमान काझी तसेच जुने शहर पोलीस ठाण्याचे हेकाँ वैशाली कुंबलवार व अंकुश फोकमारे यांनी सहकार्य केले. या प्रकरणी जुने शहर पोलीस ठाण्यात भारतीय दंड विधान कलम ३५३ व ३२३ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला होता. तत्कालीन पोलीस उपनिरीक्षक रामराव राठोड यांनी तपास करून दोषारोपपत्र दाखल केले होते.

# धनादेश अनादर प्रकरणी आरोपीला कारावास

प्रतिनिधी ६ मे

## ♦ ११ लाखाचा दंड सुनावला

**अकोला :** धनादेश अनादर प्रकरणी आरोपीला कारावास तसेच ११ लाख रुपये दंडाची शिक्षा न्यायालयाने ठोठावली.

तक्रारदार मोहम्मद शेरखा मोहम्मद फारुख व आरोपी मोहम्मद आरिफ अब्दुल कय्यम एकमेकांच्या ओळखीचे होते. तसेच आरोपी हे फिरदोस ट्रेडर्स या नावाने व्यवसाय करतात. आरोपी यांना स्वतःच्या खासगी कामासाठी व व्यवसायाकरिता पैशांची आवश्यकता असल्याने आरोपीने २०२४ च्या मे महिन्यात तक्रारदार यांना पैशाची मागणी केली. तक्रारदार व आरोपी यांची खूप वर्षांची ओळख असल्याने तक्रारदार यांनी आरोपीला २५ मे २०२४ रोजी १० लाख रुपये नगदी दिले व त्या पैशांची परतफेड करण्याकरिता आरोपीने त्यावेळेस २५ नोव्हेंबर २०२४ ची तारीख टाकून १० लाख रुपयाचा जनता बँकेचा धनादेश दिला. आरोपीने दिलेला धनादेश नमूद केलेल्या तारखेवर बँकेत टाकल्यानंतर वटविल्या जाईल अशी हमी दिली होती. पैशांची आवश्यकता असल्याने तक्रारदाराने दिलेल्या तारखेनुसार सदर धनादेश स्वतःच्या बँकेत लावला असता, न वटता अपुऱ्या निधीअभावी परत आला.

त्यानंतर तक्रारदाराने आरोपीला नोटीस देऊन सुद्धा आरोपीने पैसे परत न केल्यामुळे तक्रारदाराने विद्यमान न्यायालय, अकोला येथे धनादेश अनादरित प्रकरण ॲड. पीयूष अटल व ॲड. सुशील तलरेजा यांच्यामार्फत दाखल केले. खटल्यात तक्रारदारामार्फत दोन साक्षीदार तपासण्यात आले. तसेच आरोपीनेसुद्धा काही कागदपत्रे प्रकरणात दाखल केले. परंतु, तक्रारदाराने आरोपीविरुद्ध दाखल केलेले पुरावे सिद्ध झाल्यामुळे विद्यमान कोर्टाने २ मे रोजी निकाल देत आरोपीला सहा महिन्यांची कठोर शिक्षा तसेच निकाल तारखेपासून दोन महिन्यात ११ लाख रुपये भरण्यास सांगितले व तसे न केल्यास अतिरिक्त दोन महिन्यांच्या कठोर कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली आहे.

# जिल्ह्यात हरभरा खरेदी मर्यादा ८.१९ लाख मे.टन

प्रतिनिधी ६ मे

**अकोला :** जिल्ह्यात हरभरा खरेदीचा लक्षांक संपल्याने शेतकऱ्यांची खरेदी ठप्प झाली होती. आमदार रणधीर सावरकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व पणन मंत्री जयकुमार रावल यांच्याकडे लक्षांक वाढवण्याची विनंती केली. मुख्यमंत्र्यांनी केंद्रीय कृषीमंत्री शिवराज सिंह चौहान यांच्याशी चर्चा केली. खासदार अनुप धोत्रे यांनीही दिल्लीत कृषीमंत्र्यांकडे मागणी लावून धरली.

या पाठपुराव्याला यश आले असून केंद्र सरकारने महाराष्ट्रासाठी रब्बी २०२५-२६ हंगामात इएए अंतर्गत हरभरा खरेदीची कमाल मर्यादा ८,१९,८८२ मेट्रिक टन पर्यंत वाढवली आहे. याचे एमएसपी मूल्य ?४,८१६.८० कोटींहून अधिक आहे. सोबतच खरेदीची अंतिम मुदत ३० दिवसांनी वाढवून २९ मे २०२६ करण्यात आली आहे. आमदार रणधीर सावरकर म्हणाले, 'हा निर्णय शेतकऱ्यांच्या आर्थिक हिताचे रक्षण करण्याबाबत सरकारची संवेदनशीलता दर्शवतो. आता अधिक शेतकऱ्यांना एमएसपीचा लाभ मिळेल व बाजारात कमी भावात विक्री करावी लागणार नाही. शेतकरी कल्याणासाठी केंद्र सरकार कटिबद्ध आहे.'

# अकोला जिल्हा परिषदेचा राज्यस्तरीय सन्मान

प्रतिनिधी ६ मे

## ♦ 'Tech वारी २.०' मध्ये गौरव, आज पुरस्कार वितरण





**अकोला :** अकोला जिल्हा परिषदेच्या उत्कृष्ट कामगिरीची राज्यस्तरावर दखल घेत महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागामार्फत प्रतिष्ठेचा सन्मान जाहीर करण्यात आला आहे. 'साधना सप्ताह' अंतर्गत प्रभावी अंमलबजावणी व iGOT प्रशिक्षण उपक्रमातील उल्लेखनीय कामगिरीमुळे हा मान मिळाला असून 'Tech वारी २.०' कार्यक्रमात अकोला जिल्हा परिषदेचा गौरव होणार आहे.

जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक अनिता मेश्राम यांना सन्मान स्वीकारण्यासाठी शासनाकडून निमंत्रण आले आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली जिल्ह्यात प्रशासनिक कार्यपद्धतीत गती, पारदर्शकता आणि डिजिटल उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी झाली. कर्मचारी प्रशिक्षण, iGOT प्रणालीवरील सक्रिय सहभाग आणि कार्यक्षम नियोजन यामुळे जिल्हा परिषद राज्यात उठून दिसली. सामान्य प्रशासन विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी दिगंबर लोखंडे यांनी हाताळलेल्या विविध प्रशासकीय प्रकरणांमध्येही लक्षणीय यश मिळाले आहे. त्यांच्या प्रभावी समन्वय, नियोजन आणि अंमलबजावणीमुळे विभागातील कामकाज अधिक गतिमान झाले. विशेषतः 'साधना सप्ताह' दरम्यान विविध उपक्रमांची काटेकोर अंमलबजावणी करण्यात त्यांचा मोलाचा वाटा राहिला. सन्मान वितरण सोहळा ०६ मे रोजी दुपारी ३.०० ते ४.३० या वेळेत मंत्रालय, मुंबई येथील त्रिमूर्ती प्रांगणात आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमात राज्यातील निवडक जिल्ह्यांचा गौरव केला जाणार असून अकोला जिल्हा परिषदेचा त्यात समावेश आहे.

# कृषी यांत्रिकीकरण योजनेत बी.बी.एफ. पेरणी यंत्र उपयुक्त

## अधीक्षक कृषी अधिकाऱ्यांचे आवाहन

प्रतिनिधी ६ मे

**अकोला :** अल-निनो च्या पार्श्वभूमीवर खरीप हंगाम २०२६ मध्ये सोयाबीन, तूर, मुंग व उडीद पिकाच्या पेरणीत सुलभता आणण्यासाठी, बियाण्याची बचत व उत्पादन वाढ करण्याच्या हेतूने बी.बी.एफ. पेरणी यंत्र यांचा कृषी यांत्रिकीकरण अभियानातंर्गत समावेश करण्यात आला आहे.

वैयक्तिक शेतकरी किंवा शेतकरी गट हे याबाबिच्या अनुदानासाठी पात्र राहतील. बी.बी.एफ.पेरणी यंत्र (ट्रॅक्टर ३५ बी.एच.पी. वरील) खरेदीसाठी अनुसूचित जाती / अनुसूचित जमाती /महिला/अल्प/अत्यल्प शेतकरी यांना ५५ हजार रुपये प्रति यंत्र किंवा किमतीच्या ५० टक्के या पैकी जे कमी असेल ते व सर्वसाधारण/मोठे शेतकरी यांना ४४ हजार रुपये प्रति यंत्र किंवा किमतीच्या ४० टक्के या पैकी जे कमी असेल ते याप्रमाणे अनुदान अनुज्ञेय राहील. याबाबीची अंमलबजावणी कृषी यांत्रिकीकरण उपभियान (SMAM) मार्गदर्शक सूचनांनुसार करावी. यासाठी उपरोल्लेखित केल्याप्रमाणे महाडीबीटी प्रणालीवर या बाबीच्या लाभासाठी (https://mahadbtmahait.gov.in) या वेबसाईटवर जाऊन जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी अर्ज करावे असे आवाहन डॉ. मुरली इंगळे, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, अकोला यांनी केले आहे व अधिक माहितीकरिता कृषि विभागाच्या सहायक कृषी अधिकारी, उप कृषि अधिकारी व मंडळ कृषि अधिकारी व तालुका कृषि अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा.

# श्री क्षेत्र आकोली जहागीरमध्ये आदिशक्ती संत मुक्ताई ब्रह्मलीन सोहळा

प्रतिनिधी ६ मे





**अकोट :** श्रीक्षेत्र आकोली जहागीर येथे ५ ते १२ मे दरम्यान आदिशक्ती श्री संत मुक्ताई ब्रह्मलीन सोहळा संपन्न होत असून या निमित्त विविध कार्यक्रम सुनियोजित आहेत. सद्गुरु श्री संत वासुदेवजी महाराज यांचे कृपाशीर्वाद, मार्गदर्शन व उपस्थिती लाभलेल्या आणि गत ३३ वर्षांपासून सुरू असलेल्या या सप्ताहामध्ये श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण, पहाटे काकडा आरती, दुपारी प्रवचन, सायंकाळी हरिपाठ, रात्री हरिकीर्तन असा कार्यक्रम सुनियोजित आहे.सप्ताहातील ज्ञानेश्वरी पारायण पिठाचे नेतृत्व .ह.भ.प. वासुदेव महाराज आस्वार यांच्याकडे असून दररोज दुपारच्या सत्रामध्ये सर्व ह.भ.प. शिवशंकर महाराज जायले, अविनाश म.सावरकर, अनिल म. नराजे, बाळकृष्ण म. आमले, डॉ. गोपाल म. झामरे, आत्माराम म. वाकोडे, वासुदेव म. महल्ले यांची प्रवचन सेवा तर रात्रीच्या सत्रामध्ये देवेंद्र म. रेखाते, शारंगधर म. मेहुणकर, उमेश म. मोहोकार, पुरुषोत्तम म. तळोकार, राम म. गाढे, अरुण म. घोरोडे, ज्ञानेशप्रसाद म. पाटील यांची कीर्तन सेवा होणार आहे. तसेच वैशाख कृष्ण दशमी या तिथिला दि १२ मे रोजी श्री संत मुक्ताई ब्रह्मलीन सोहळ्यानिमित्त पहाटे श्री संत मुक्ताईंचा महाअभिषेक होऊन सकाळी १०वा..ह.भ.प. वासुदेव म. आस्वार यांचे काल्याचे कीर्तन होईल.

तदनंतर महाप्रसादाचा भव्य कार्यक्रम संपन्न होणार आहे. श्री संत भास्कर महाराज व श्री संत वासुदेव महाराज यांच्या वाड्यास्थित श्री संत गजानन महाराज मंदिरामधील प्रस्तुत सप्ताहामध्ये श्रवणाचा, दर्शनाचा लाभ घ्यावा व ज्ञानेश्वरी पारायणास बसून उपकृत करावे व आकोली जहागीर येथील श्री संत गजानन महाराज यांनी सजल केलेली विहीर शेत सर्व्हे नंबर ५२ मधील श्रींच्या पुष्करणीच्या तीर्थ प्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्री.ह.भ.प. वासुदेवराव महाराज महल्ले यांनी केले आहे.


अमूल्य कळ्या

६ वा वाढदिवस



कु.रिध्दी दिपक शर्मा
रा. अकोला



हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ▪ **संपर्क –** 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642, RRC Helpline No. 8484842135


CMYK CMYK